१०४ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

NAVAKAL

• मुंबई, शुक्रवार १० एप्रिल, २०२६ • वर्ष-१०४, अंक-३६, पाने-८, किंमत: ₹ ७

• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 36 Marathi - Daily - Mumbai, 10 April, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे | 24x7 : www.navakal.in | Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

२४ तासांतच Ceasefire मोडला?

navakal.in

@navakal.news | Navakal Digital Network | @_NDN_Offical | @NavakalNews

# युद्धबंदीचा फज्जा! इस्रायलचा लेबनॉनवर बॉम्बवर्षाव

# २५४ निष्पाप नागरिकांचा बळी! इराणने होर्मुज पुन्हा बंद केली

■ तेहरान

**काल** युद्धबंदीची घोषणा करताना डोनाल्ड ट्रम्प यांनी ही युद्धबंदी पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांच्या मध्यस्थीने झाली असे जाहीरपणे सांगत शरीफ यांचे कौतुक केले होते. तर ही तात्पुरती युद्धबंदी मान्य करताना इराणने अमेरिकेसमोर दहा कलमी प्रस्ताव ठेवला होता. या प्रस्तावात युद्धबंदीनंतर लेबनॉनवर पुन्हा हल्ले होता कामा नयेत, हा एक प्रमुख मुद्दा होता. युद्धबंदी अंशतः मान्य करताना इस्त्रायलने मात्र कालच हा मुद्दा ट्रम्प यांच्याकडे लावून धरत युद्धबंदीमध्ये लेबनॉनचा समावेश करण्यास विरोध केला होता. मात्र युद्धबंदी करण्याची घाई झालेल्या ट्रम्प यांनी इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांची समजूत घालत इराणने दिलेल्या प्रस्तावावर विचार करण्याची ग्वाही दिली होती. इराणच्या प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी उद्या १० एप्रिलची तारीखही निश्चित करण्यात आली. पाकिस्तानच्या इस्लामाबादमध्ये इराण आणि अमेरिकेच्या प्रतिनिधींची बैठकही आयोजित करण्यात आली.

मात्र या सर्व प्रक्रियेत अपेक्षेप्रमाणे नेतन्याहू यांनी खोडा घातला. लेबनॉनवर भीषण हल्ले करण्याबरोबरच नेतन्याहू यांनी इराणलाही डिवचले. इराणची ताकद आता संपुष्टात आली आहे. आम्ही आता अधिक ताकदीने लेबनॉनवर हल्ले करू, अशी चिथावणीखोर भाषा नेतन्याहू यांनी केली. याचा परिणाम होऊन इराणने आज तत्काळ होर्मुजची सामुद्रधुनी बंद केली. काही तासांमध्ये मिळालेल्या या कलाटणीमुळे होर्मुज परिसरात पुन्हा सन्नाटा पसरला. एकही जहाज आज होर्मुज पार करू शकले नाही. पान ७ वर



**पाकिस्तानच्या मध्यस्थीने अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काल स्वतःच घोषणा करून जाहीर केलेल्या दोन आठवड्यांच्या युद्धबंदीचा अवघ्या २४ तासांच्या आत फज्जा उडाला. ही तात्पुरती युद्धबंदी मान्य करून कालच इराणने होर्मुजची सामुद्रधुनी खुली केल्याने संपूर्ण जगाने सुटकेचा निःश्वास टाकला होता. मात्र हा दिलासा अगदीच अल्पजिवी ठरला. युद्धबंदीनंतर इस्त्रायलने लेबनॉनवर आणखी तीव्र बॉम्बहल्ले केले. राजधानी बैरूत आणि पूर्वेकडील अल हर्मेन शहरावर इस्त्रायलने अक्षरशः बॉम्बवर्षाव केला. या हल्ल्यात लेबनॉनचे सुमारे २५४ निरपराध नागरिक मारले गेले. त्यामुळे संतापलेल्या इराणने युद्धबंदी रद्द करून होर्मुजची पुन्हा नाकेबंदी केली. आमच्याशी जरादेखील आगळीक झाली तर आमचेही बोट ट्रिगरवर आहे हे विसरू नका, असा इशारा इराणचे राष्ट्राध्यक्ष पेजेश्कियान यांनी अमेरिका आणि इस्त्रायलला दिला.**

## थोडक्यात...

### 'आपले सरकार' पोर्टल ९ दिवसांपासून ठप्प

**मुंबई -** शासकीय सेवा ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध करून देणारे 'आपले सरकार' पोर्टल तब्बल नऊ दिवसांपासून ठप्प असल्याने सर्वसामान्य नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. १ एप्रिलपासून पोर्टलची सेवा खंडित झाली. तांत्रिक देखभाल व अद्ययावत कामांसाठी २ ते ५ एप्रिलदरम्यान सेवा बंद राहणार असल्याची पूर्वसूचना देण्यात आली होती. मात्र, ठरलेल्या कालावधीनंतरही पोर्टल सुरू न झाल्याने नागरिकांना मोठा मन:स्ताप सहन करावा लागत आहे. महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांतील सेवा या पोर्टलद्वारे उपलब्ध होत असल्याने त्याचा मोठा फटका नागरिकांना बसत आहे. महाआयटीने विकसित केलेले हे पोर्टल नागरिकांना सुलभ, पारदर्शक व वेळेत सेवा देण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आले होते. मात्र, सर्व्हर डाऊनमुळे सेवा पूर्णपणे ठप्प झाल्या आहेत. आपले सरकार आणि सेतू केंद्रांवर नागरिकांना वारंवार फेऱ्या माराव्या लागत आहेत.

### सोने-चांदीच्या दरात पुन्हा घसरण

**मुंबई -** सोने-चांदीच्या दरांनी पुन्हा एकदा मोठी चढ-उतार दाखवली आहे. काल युद्धाच्या भीतीमुळे गगनाला भिडलेले दर आज अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्धविरामाच्या घोषणेनंतर मोठ्या प्रमाणात घसरले आहेत. आज सोन्याच्या दरात तब्बल २१०० रुपयांची घसरण नोंदवण्यात आली असून, चांदीच्या दरातही



सुमारे ७००० रुपयांची घट झाली आहे. सध्या २४ कॅरेट सोने सुमारे १,४९,५०० रुपये प्रति तोळा (जीएसटीसह १,५३,९८५ रुपये) दराने उपलब्ध आहे, तर चांदीचा दर २,४०,००० रुपये प्रति किलो (जीएसटीसह २,४७,२०० रुपये) इतका झाला आहे. जळगावमधील सराफ व्यावसायिकांच्या मते, सध्याची जागतिक परिस्थिती अत्यंत अस्थिर आहे. एका दिवसात मोठी वाढ आणि दुसऱ्या दिवशी मोठी घसरण होत असल्याने बाजारात अनिश्चितता निर्माण झाली आहे.

### अमेरिकन न्यायालयाचा गौतम अदानींना दिलासा

**न्यूयॉर्क -** भारतीय उद्योगपती गौतम अदानी आणि त्यांचे पुतणे सागर अदानी यांनी अमेरिकेची बाजार नियामक संस्था सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज कमिशनने (एसईसी) दाखल केलेला दिवाणी फसवणुकीचा खटला रद्द करण्याची मागणी केली आहे. त्यांनी म्हटले आहे की, हे प्रकरण अमेरिकेच्या

#### खटला रद्द करण्यासाठी सुनावणीला परवानगी

अधिकार क्षेत्राबाहेर आहे आणि यात कोणतेही ठोस आरोप नाहीत. न्यायालयाने या प्रकरणाच्या याचिकेवरील सुनावणीला परवानगी दिली आहे. अदानी समूहासाठी हा मोठा दिलासा मानला जात आहे. एसईसीने २४ नोव्हेंबर रोजी गौतम अदानी आणि सागर अदानी यांच्या विरोधात खटला दाखल केला होता. एसईसीने आरोप केला होता की, अदानी उद्योग समूहातील कंपनी अदानी ग्रीन एनर्जी लिमिटेडने २०२१ मध्ये बॉन्ड जारी करताना गुंतवणूकदारांची दिशाभूल केली.

## महिला आरक्षणाला पाठिंबा द्या

### मोदींचे सर्व पक्षांना आवाहन



**लोकसभेत आणि राज्य विधानसभांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्यासंबंधीच्या नारीशक्ती विधेयकांना पक्षीय अभिनिवेश बाजूला ठेवून भरभरून पाठिंबा द्या, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज एका व्हिडिओ संदेशाच्या माध्यमातून देशातील सर्व राजकीय पक्षांना उद्देशून केले.**

■ नवी दिल्ली

**पंतप्रधान** मोदी यांनी या विषयावर लिहिलेला एक लेख आज काही वर्तमानपत्रांमध्ये प्रसिध्द झाला. त्याच अनुषंगाने मोदी यांच्या वतीने हा व्हिडिओ संदेश जारी करण्यात आला.

या व्हिडिओ संदेशात मोदी म्हणतात, 'सन २०४७ मध्ये जेव्हा आपण स्वातंत्र्याचा शतक महोत्सव साजरा करू तोपर्यंत आपला देश एक विकसित राष्ट्र बनला पाहिजे, असा निर्धार तमाम भारतीयांनी केला आहे. सरकारचा प्रमुख म्हणून माझ्या दोन अडीच दशकांच्या अनुभवावरून मी असे म्हणू शकतो की, आपल्याला जर विकसित भारताचे उद्दिष्ट्य गाठायचे असेल तर आपल्याला आपल्या मातृशक्तीला, नारीशक्तीला त्यांच्या पूर्ण सामर्थ्याचा विकासाच्या प्रक्रियेत समावेश करावा लागेल. सरकारने काही वर्षांपूर्वी नारीशक्ती वंदन अधिनियम सर्वपक्षीय सहमतीने मंजूर केले होते. आता सर्वपक्षांची अशी इच्छा आहे की, २०२९ मध्ये जेव्हा लोकसभेच्या निवडणुका होतील तेव्हा त्यात नारीशक्तीला ३३ टक्के स्थान मिळाले पाहिजे. गेल्या काही दिवसांपासून आम्ही यासंबंधीच्या विधेयकाबाबत विविध पान ७ वर

### निवडणूक आयोगाचा कानाडोळा

पंतप्रधान मोदींचा हा व्हिडिओ संदेश सर्व वृत्तवाहिन्यांवरून प्रसारित केला गेला तेव्हा दुसरीकडे केरळ, आसाम आणि पुद्दुचेरी येथे विधानसभा निवडणुकीसाठी मतदान होत होते, हा योगायोग नक्कीच नाही हे राजकारणातले शेंबडे पोरही सांगेल. मोदी आणि भाजपाने मतदारांवर प्रभाव टाकण्यासाठी अचूक वेळ साधत हा व्हिडिओ पुढे आणला. वास्तविक निवडणूक आचारसंहितेनुसार मतदानादरम्यान अशाप्रकारे मतदारांवर प्रभाव टाकण्यास निवडणूक आयोग परवानगी देणार नाही. पण मोदींचा हा व्हिडिओ नुसता पाहण्यात बहुधा आयोगाने धन्यता मानली. त्यामुळे मतदान सुरू असताना सर्व वृत्तवाहिन्यांवर पान ७ वर

## अजितदादांसारखे गुलाबी जॅकेट पार्थची खासदारकीची शपथ

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

■ नवी दिल्ली

**दिवंगत** उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांनी राज्यसभेच्या खासदारपदाची शपथ घेतली. त्यांनी ही शपथ इंग्रजी भाषेत घेतली. देशाचे उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी त्यांना शपथ दिली. विशेष म्हणजे, शपथविधीच्या वेळी पार्थ पवार यांनी अजित पवार यांच्याप्रमाणेच गुलाबी रंगाचे जॅकेट परिधान केले होते, ज्याची राजकीय वर्तुळात चर्चा रंगली. त्यांच्या या प्रतिकात्मक शैलीकडे अनेकांचे लक्ष वेधले गेले. या शपथविधीमुळे पवार कुटुंबातील आणखी एक चेहरा राष्ट्रीय राजकारणात सक्रिय झाला आहे. यावेळी सुनेत्रा पवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, भाजपा नेते जे. पी. नड्डा आणि काँग्रेसचे खासदार जयराम रमेश उपस्थित होते.



शपथविधीनंतर ते सुनेत्रा पवार आणि सुनील तटकरे यांच्या निवासस्थानी दाखल झाले, जिथे त्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले.

## आसाम, केरळ आणि पुद्दुचेरीमध्ये भरघोस मतदान! ४ मे रोजी निकाल

■ नवी दिल्ली

**आसाम,** केरळ आणि पुद्दुचेरी या तीन राज्यांमध्ये विधानसभा निवडणुकीसाठी आज मतदान झाले. संध्याकाळपर्यंत आसाममध्ये ८७.४२ टक्के, पुद्दुचेरीमध्ये ७५.४० टक्के आणि केरळमध्ये ७५.०७ टक्के असे भरघोस मतदान झाले आहे. आसाममध्ये १२६ जागा, पुद्दुचेरीमध्ये ३० जागा आणि केरळमध्ये १४० जागांसाठी हे मतदान झाले. तिन्ही ठिकाणी भरघोस मतदान झाले असून, उमेदवाराचे भवितव्य ४ मे रोजी उघड होणार आहे.

आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वास यांनी गुवाहाटी येथील माँ कामाख्या मंदिरात जाऊन दर्शन घेतले. त्यानंतर दुपारी त्यांनी पत्नीसह जलुकवारी येथे मतदान केले. आसाममध्ये एका मतदान केंद्राचा पान ५ वर

## भोंदूबाबा अशोक खरातला तिसऱ्या गुन्ह्यात ५ दिवसांची पोलीस कोठडी

■ नाशिक

**नाशिकमधील** भोंदूबाबा अशोक खरात याला नाशिक सत्र न्यायालयाने आज तिसऱ्या गुन्ह्यात ५ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. न्यायाधीश बी. एन. इचपुराणी यांच्या न्यायालयात आजची सुनावणी झाली. या सुनावणीसाठी आरोपी अशोक खरात व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे उपस्थित होता.

यापूर्वी दुसऱ्या गुन्ह्यात सुनावलेली ७ दिवसांची पोलीस कोठडी संपल्यानंतर आज त्याला न्यायालयात हजर करण्यात आले होते. हा पान ७ वर

## हाफकीनचे खासगीकरणाकडे पाऊल कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण

■ मुंबई

**पोलिओमुक्त** भारतासाठी मोठ्या प्रमाणावर लसीचे उत्पादन करणाऱ्या हाफकीन जीवऔषध महामंडळाचे



खासगीकरण करण्याच्या दिशेने पावले उचलली जात आहेत. लहान मुलांना दिली जाणारी त्रिगुणी लस ही आता हाफकीनमध्ये उत्पादित न करता आता खासगी कंपनीमार्फत तयार करून घेण्यात येण्याची हालचाल सुरू आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये भीती निर्माण झाली आहे.

या संस्थेत सुमारे ४५० कर्मचारी आहेत. त्यांच्या रोजगारावर संकट येण्याची शक्यता व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर हाफकीन बायो-फार्मास्युटिकल कॉर्पोरेशन युनियनचे अध्यक्ष गोविंद मोहिते यांनी न्यायालयात जाण्याचा इशारा दिला आहे. जागतिक आरोग्य संघटनेने लस निर्मितीसाठी दिलेले लसीचे संयुग (सीड स्ट्रेन) खासगी कंपनीकडे सुपूर्द करून उत्पादन हक्क देण्यासाठी स्वारस्य पत्र मागविण्यात आले आहे. यासाठी पान ७ वर

## शाळा सोडल्याचा दाखला वयाचा निर्णायक पुरावा नाही

■ मुंबई

### उच्च न्यायालयाचा निर्णय पोक्सोतील आरोपीला जामीन

**शाळा** सोडल्याचा दाखला हा वयाचा निर्णायक पुरावा मानता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा उच्च न्यायालयाने एका प्रकरणात देत त्याच आधारे पोक्सोच्या गुन्ह्यातील आरोपीला जामीन मंजूर केला. २५ वर्षीय तरुणाने पीडित मुलीवर बळजबरीने बलात्कार केल्याचा आरोप आहे. तथापि, दोघांमध्ये प्रेमसंबंध असण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचे न्यायालयाने नमूद केले. न्यायमूर्ती आर. एम. जोशी यांच्या एकलपीठाने हा निर्णय देत आरोपीला जामिनाचा दिलासा दिला.

२५ वर्षीय आरोपी तरुण आणि १५ वर्षांची पीडित मुलगी यांच्यात प्रेमसंबंध होते. आरोपीने आपल्या बहिणीची ओळख करून देण्याच्या बहाण्याने पीडित मुलीला घरी नेले. तेथे पीडित मुलीला फ्लॅटमध्ये डांबून ठेवले आणि बळजबरीने बलात्कार केल्याचा आरोप आहे. पीडित मुलीने यासंदर्भात जबाब दिल्यानंतर आरोपीची वैद्यकीय तपासणी करण्यात आली होती. त्यानंतर १० ऑगस्ट २०२२ रोजी आरोपी जयेश पारधी याला अटक करण्यात आली होती. तेव्हापासून तो तुरुंगात होता. त्याने पान ५ वर

## अमेरिकन इन्फ्लुएन्सरकडून भारतीय नावांची खिल्ली

**अमेरिकेत एका सोशल मीडिया इन्फ्लुएन्सरच्या वक्तव्यामुळे नव्या वादाला तोंड फुटले आहे. टेक्सासमधील उजव्या विचारसरणीचा इन्फ्लुएन्सर एलिजाह शेफर याचा एक व्हिडिओ व्हायरल झाला असून, त्यात भारतीय नावांची खिल्ली उडवल्याचा आरोप होत आहे.**




■ वॉशिंग्टन

**व्हिडिओमध्ये** शेफर स्थानिक निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांच्या नावांवर उपहास करताना दिसतो. साई कृष्णा, श्रीकांत रेड्डी, विजय कार्तिक आणि बाबू वेंकट यांसारख्या नावांना त्याने पुरेसे अमेरिकन नाहीत असे म्हणत त्यांची खिल्ली उडवली. पान ५ वर

## बारामती पोटनिवडणुकीतून काँग्रेसच्या मोरेंची माघार

■ मुंबई

**राज्याचे** लक्ष लागलेल्या बारामती विधानसभा पोटनिवडणुकीतून काँग्रेसचे उमेदवार आकाश मोरे यांनी अखेर माघार घेतली. आज उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी पत्रकार परिषद घेऊन या पोटनिवडणुकीतून माघार घेत असल्याचे जाहीर केले. त्यासोबत इतर ३० उमेदवारांनी या पोटनिवडणुकीतून आपले अर्ज मागे घेतले असून, एकूण २३ उमेदवार पोटनिवडणूक रिंगणात आहेत. त्यामुळे राष्ट्रवादीच्या उमेदवार आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचा विजय काहीसा सुकर झाला आहे. हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, सामंजस्य आणि राज्याच्या संस्कृतीची किनार पाहता आम्ही आमच्या उमेदवाराचा अर्ज मागे घेण्याचा निर्णय घेतला. अर्ज मागे घेताना कोणत्याही अटी शर्ती आम्ही घातलेल्या नाहीत, हेही तितकेच खरे आहे. आज आम्ही दोन पावले मागे घेत असलो तरी २०२९ साली बारामतीमध्ये काँग्रेसचा आमदार असेल, ही ग्वाही आम्ही देतो.


विना औषध विना ऑपरेशन उपचार

डॉ. लोहिया ॲक्युपंक्चर

झटपट गुण देण्यासाठी सदैव तत्पर

- उपयोगिता -

• मणके, स्लिप डिस्क, मान-कंबरदुखीसाठी
• गुडघे ऑपरेशन टाळण्यासाठी, संधिवात
• फ्रोजन शोल्डर, खूबा दुखणे, न्यूरोपॅथी
• लकवा : अर्धांगवायू - चेहरा, कंपवात
• PCOD, वंध्यत्व, मुलांमधील मंदवाढ
• ॲलर्जी - सर्दी, दम लागणे, ॲसिडिटी



25 वर्षांपासून मुंबईत ॲडव्हान्स्ड व सुरक्षित ॲक्युपंक्चर उपचार

मुलत: ॲलोपॅथिक तज्ज्ञांद्वारे संचालित

DADAR 7718876101 | THANE 7718876102 | ANDHERI 7718876100
SION 7718876101 | VASHI (SEC-4) 7700905550 | PANVEL 7718876099

TV9 मराठी

लाईव्ह मुलाखत - डॉ. लोहिया

शुक्रवार, दि. 10 एप्रिल, दु. 3:20 वा. अवश्य पहा.

विषय : गुडघे, मणके, लकवा इ. वर विना औषध उपचार

Google YouTube Search 'dr lohiya' for Interviews, News, Location, Reviews & more..

**पहिले त्र्यंबक रोडवरील घरे, दुकाने बांधकामे अमानुषपणे पाडली, आवाज उठवू दिला नाही. सुरुवातीलाच अतिशय भयंकर पोलीस फोर्स आणून आवाज दाबले, भांडायसाठी स्त्री अधिकारी मध्ये घातल्या, स्थानिकांमध्ये फूट पाडली, स्थानिक नेते वळवून घेतले. धडाका बघून पब्लिक भयभीत झाली. आमदार मुके झाले पद्धतशीर.**



# त्यांनी पद्धतशीरपणे काम केले ...

**अंबरिश मोरे**

**मग पेगलवाडी** पासून पुढे एकही रुपया न देता घरादारांवर बुलडोझर फिरवले, पण त्र्यंबक रोडवरील भयंकर पाडापाडी पाहून स्थानिक घाबरलेले होते. त्यांची विरोध करायची हिंमतच संपली होती. सगळं पद्धतशीर.

जव्हार ते त्र्यंबक, वाडा ते इगतपुरी पहिने या आदिवासी भागातही आदिवासींची घरे, शेती रस्त्यासाठी घेतले. पण त्र्यंबक रोडवरील भयानक प्रकार पाहून गरीब आदिवासींना काही सुचलेच नाही. त्यात आमदार वेगळ्या पक्षाचा असल्याने त्याचेही चालत नाही. यातही हजारो झाडे जाणार आहेत, गेली आहेत. सगळं काम पद्धतशीर.

तपोवन चळवळीत स्वतःची माणसे बसवून चळवळीची दिशा बदलली आणि जनतेला तपोवनात अडकवून नाशिकच्या पर्यावरणाचा गेम चालू केला. एकदमच पद्धतशीर

दाबून धरलेला रोपवे परत उरावर आणून बसवला. पद्धतशीर डोकेबाजी.

मग आला रिंग रोड चा नंबर. पैसे घ्या, नाही घेतले तर वर्षानुवर्षे कोर्टात फेऱ्या मारा. नाशिकचा कणा म्हणजे नाशिक तालुक्याची शेती, शेतातील घरे, विहिरी सगळे काही रस्त्याखाली घेतले. काही ठिकाणी स्थानिक नेते फोडले, विकत घेतले, गावकऱ्यांना उल्लू बनवले. श्रीमंतांचे बंगले वाचावेत म्हणून तीन-तीन वेळा रस्त्याच्या अलाईनमेंट बदलल्या. कारण विकास. मागच्या कुंभमेळ्यापासून झोपले होते का? एकाच वर्षात सगळा विकास कसा करणार? पद्धतशीर....

नाव कुंभमेळ्याचे असले तरी वाढवण बंदरासाठी शेतमाल जाण्यासाठी रस्ते मोठे होत आहेत यावरून नाशिकचा शेतीमाल भयंकर मोठ्या प्रमाणात निर्यात होणार आहे म्हणजे दुसऱ्या देशात जाणार आहे म्हणून रस्ते मोठे होत आहेत असे सांगितले. पद्धतशीर.

पण सगळी शेती रस्त्यातच गेल्यावर शेतीतून उत्पन्न कसे घ्यायचे हेही मायबाप सरकारने सांगावे. बर ते जनतेच्या पैशाने बांधलेले वाढवण बंदर पोर्ट ट्रस्ट ॲथॉरिटीला देणार का मित्राला फुकटमध्ये देणार हेही सांगावे. आणि विकास फक्त औद्योगिक



क्षेत्राचाच का व्हावा? शेतकऱ्यांचा, आदिवासींचा विकास होऊ शकत नाही का? म्हणून विकासाचे नरेटिव्ह पसरवले, पद्धतशीर....

एक अधिकारी गोड बोलतो, दुसरा अधिकारी अंगावर येतो. यांच्या आयएएस ट्रेनिंग मधील गुड कॉप बॅड कॉप हे इकडे वापरतात हे पाहून पद्धतशीरपणे हसू येते. गोड बोलून गाफील ठेवायचे आणि गेम करायचा... पद्धतशीरपणे

शहरातील वृक्षतोडीसाठी वाढता विरोध पाहून तीन दिवसांची शासकीय सुट्टी बघून मागील दोन दिवसात अमानुषपणे झाडांच्या कत्तली केल्या. आतापर्यंत सिव्हेज ट्रीटमेंट साठीची ८०० अधिक ५०० झाडे सोडून पंधराशे पेक्षा झाडे कापली. यासाठी सर्व पर्यावरण प्रेमींना घरातच पोलीस बंदोबस्तात ठेवले. गरीब पर्यावरण प्रेमींना सरकार घाबरते? का? प्रदर्शने होऊ नयेत म्हणून घरातच बसवून ठेवले. सगळं कसं पद्धतशीर.

पक्ष बदलेल, पण झाडे तोडणारच हा मागील वृक्षतोडीच्या प्रकरणानंतर डायलॉग दिलेल्या राजकीय नेत्याने फक्त स्वतःच्या इगोसाठी प्रचंड मोठी वडाची झाडे तोडायला लावली. अरे त्या बिल्डरांच्या मोकळ्या जमिनी आणि नवीन बांधलेल्या इमारती दिसत नाहीत म्हणून झाडांच्या सुपाऱ्या घेतल्या हेही सांगा की. पद्धतशीर...

आज पर्यावरणप्रेमींना उचलून पोलीस स्टेशनला नेले व शेवटचे झाड कापून झाल्यानंतरच सोडले. खरंतर नाशिक महानगरपालिका हद्दीत वड-पिंपळ तोडायला परवानगी नाही. पण भयंकर पोलीस फोर्स आणून काम दामटून नेले. वड-पिंपळ तोडता येत नाहीत. त्यामुळे पोलिसांनी मनपा अधिकाऱ्यांना समजावून सांगणे गरजेचे होते. तसे झाले नाही. सरकार डरती है पण दाखवते वेगळेच. पद्धतशीरपणे...

महापालिकेतही स्त्री अधिकारी म्हणून आणून बसवल्या आहेत. पुरुषांशी भांडता येते, बायकांशी भांडले तर उचलून मध्ये टाकता येते ही सरकारची नेहमीची टेक्निक आहे. आपण मराठी माणसे शिवाजी महाराजांचे शिष्य असल्याने स्त्रियांशी नम्रतेने बोलतो याचा फायदा घेतला जात आहे. या बायांचे एटीट्यूड बघितले तर हे ब्रिटिश राज्यातील अधिकारी आहेत आणि आपण गुलाम भारतीय, यासारखाच फील येतो. पद्धतशीरपणे जनतेचा गेम.

झाडे तोडीला विरोध म्हणजे हिंदू धर्माला विरोध म्हणजे कुंभमेळ्याला विरोध असे ४० पैसे मेसेज पाठवून नरेटिव्ह पसरवले. मंद भक्त तेच सर्वत्र पास करू लागले. पद्धतशीर..

पद्धतशीरपणे परप्रांतीय ठेकेदारांना पोसण्यासाठी नाशिकचा बळी. कारण जनता षंढ आहे आणि नेते कणाहीन. मोकळं कुरण मिळालं, पद्धतशीर

तपोवनात नंतर साधु घुसवून तेही ताब्यात घेणार हे भविष्य मी आत्ताच सांगत आहे. हरकत नाही. तपोवन त्यांचेच आहे. कुंभमेळा आमचा आहे. जाताना त्यांनी पद्धतशीरपणे झाडे लावून जावे तेही शहरभर.

जॉर्ज ऑरवेलच्या द निमल फार्ममधील डुकरे, त्यांना संरक्षण देणारे कुत्रे आणि यांना पोसणारे इतर सर्व बावळट प्राणी यांची फार फार आठवण झाली. ऑरवेल जिवंत असता तर अजून एखादी भारी कादंबरी त्याने नक्कीच लिहिली असती.

असो, पण त्यांनी फार पध्दतशीरपणे काम केले. हळूहळू भीती जनतेमध्ये पसरवली आणि जनता षंढ बनवली. नाशिकची जनता मूर्ख आहे हे परत एकदा सिद्ध झाले. पद्धतशीर

दिवसभर जिथे आंदोलन झाले त्यापेक्षा भलत्याच पोलीस स्टेशन मध्ये बसवून ठेवलेले सर्व पर्यावरण प्रेमी आपापल्या घरी पोहोचले आहेत. धन्यवाद.

# लातूर-अंबाजोगाई महामार्गावर अपघात! तहसीलदार गिड्डेंचा मृत्यू

■ बीड




**बीडच्या** केज तालुक्याचे तहसीलदार राकेश गिड्डे यांचे आज सकाळी लातूर-अंबाजोगाई महामार्गावर झालेल्या कार अपघातात निधन झाले. रेणापूर फाट्याजवळ त्यांच्या कारला अपघात होऊन गिड्डे यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे महसूल विभागात तसेच केज तालुक्यात शोककळा पसरली आहे.

अपघाताच्या वेळी कारमध्ये राकेश गिड्डे हे एकटेच होते. पहाटेच्या सुमारास वाहन वेगात असताना कार अचानक रस्त्याच्या खाली जाऊन पलटी झाल्याचे सांगितले जाते. अपघात इतका भीषण होता की, त्यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. आवाज ऐकून स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. पण तोपर्यंत उशीर झाला होता.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी रेणापूर येथील ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आला. राकेश गिड्डे यांनी केज तहसील कार्यालयाचा पदभार स्वीकारल्यानंतर अनेक धोरणात्मक निर्णय घेत जनहिताची कामे मार्गी लावली होती. त्यांच्या निधनाने महसूल विभागाने एक कर्तव्यदक्ष व अभ्यासू अधिकारी गमावल्याची भावना व्यक्त होत आहे.

# ३ पोलिसांनीच प्राचार्यांकडे ७ लाखांची खंडणी मागितली

■ पुणे

**गुन्हेगारांवर** वचक बसवण्याची जबाबदारी असलेल्या पोलिसांनीच खंडणीखोरीचा मार्ग पत्करल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला आहे. एका नामांकित शैक्षणिक संस्थेच्या महिला प्राचार्याला ब्लॅकमेल करून ७ लाख रुपये उकळल्याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक अजित बडे, पोलीस कर्मचारी सोनाली हिंगे आणि सुदाम तायडे या तीन जणांविरुद्ध बंडगार्डन पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अजित बडे सध्या सायबर पोलीस स्टेशनमध्ये कार्यरत असून, सोनाली हिंगे या दामिनी पथकात कार्यरत असून त्यांची सोशल मीडियावर 'रील स्टार' म्हणून ओळख आहे. त्या शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे कार्यरत आहे. सुदाम तायडे यांचीही याच पोलीस ठाण्यात नेमणूक आहे या तिघांनी संगनमताने प्राचार्यांना जाळ्यात ओढले. तुमच्यावर पोक्सो कायदाअंतर्गत गंभीर गुन्हा दाखल होऊ शकतो आणि अटक होईल, अशी भीती दाखवत त्यांनी प्रकरण मिटवण्यासाठी ७ लाख रुपयांची मागणी केली. अटकेच्या आणि बदनामीच्या भीतीने प्राचार्यांनी ही रक्कम दिली. मात्र, हा प्रकार संशयास्पद वाटल्याने संबंधित प्राचार्यांनी वरिष्ठांकडे तक्रार केली. तक्रारीची दखल घेत अमितेश कुमार यांनी तत्काळ चौकशीचे आदेश दिले.

# कुपर पालिका रुग्णालयात कुत्रे-मांजरांचा उच्छाद



■ मुंबई

**विलेपार्ले** इर्ला येथील पालिकेच्या कुपर रुग्णालयात गेल्या महिन्यात उंदरांनी रुग्णांना चावा घेतल्याची घटना ताजी असताना आता भटके कुत्रे-मांजरांचा रुग्णालयात वावर सुरू असल्याने रुग्ण त्यांचे नातेवाईक व कर्मचाऱ्यांमध्ये दहशतीचे वातावरण आहे. यामुळे रुग्णांच्या आरोग्यावर प्रश्नचिन्ह लागले आहे. रुग्णालयाच्या आवारात आणि रुग्णांच्या वॉर्डात कुत्रे-मांजरांनी आपला घरोबा थाटला आहे. त्यामुळे त्यांच्या विष्ठेची अस्वच्छता या कारणाने संसर्गाचा धोका अधिक वाढला आहे. पालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागाला रुग्णांच्या आरोग्याची चिंता आहे की नाही? असा सवाल प्रश्न स्थानिकांकडून उपस्थितीत करण्यात येत आहे. या संदर्भात रुग्णालयाच्या व्यवस्थापनाकडे विचारणा केली असता, वरील माहितीला दुजोरा देऊन असे सांगण्यात आले की, कुत्रे व मांजरी पकडण्यासाठी पालिकेच्या कुत्रे पकडणाऱ्या पथकाशी संपर्क साधला आहे. त्यातच काही बाहेरील व्यक्ती रुग्णालयात येऊन या भटक्या प्राण्यांना अन्न खाऊ घालतात. त्यांना विरोध केला तर कर्मचाऱ्यांसोबत हमरीतुमरीवर येतात. तेव्हा प्राण्यांना खाऊ घालणाऱ्यांनी येथील भटकी कुत्री-मांजरी दत्तक घ्यावीत, असे आमचे मत आहे.

# झोपडपट्टी पुनर्वसनावर परिणाम वाढीव कॉर्पस फंड शासनात प्रलंबित

■ मुंबई

**राज्य** शासनाच्या नवीन धोरणानुसार एसआरए योजनेतील रहिवाशांना १ लाख रुपये कॉर्पस फंड देण्यासाठी नगरविकास विभागाने २२ सप्टेंबर, २०२५ रोजी सूचना जारी केली होती. यावर हरकती व सूचना मागविण्यासाठी एक महिन्याची मुदत विकासक व नागरिकांना देण्यात आली होती. मात्र मुदत संपून दीड वर्ष झाले कॉर्पस फंडाच्या तरतुदीची अंमलबजावणी कधी? असा सवाल झोपडीधारक विचारत आहेत.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या कार्यालयातून मिळालेल्या माहितीनुसार एसआरए योजनेतील पात्र झोपडीधारकांना विकासकांकडून ४० हजार रुपये कॉर्पस फंड दिला जातो. ही रक्कम प्राधिकरणाकडे जमा करण्याची तरतूद आहे. शासनाच्या धोरणानुसार एसआरए योजनेतील १७ मजली पेक्षा उंच बांधण्यात येणाऱ्या इमारतीतील प्रत्येक रहिवाशांच्या नावे १ लाख रुपये कॉर्पस फंड प्राधिकरणाकडे जमा केली जावी, अशा सूचनाचे पत्र शासनाने काढले होते. याची अंमलबजावणी करण्यापूर्वी एक महिन्यात हरकती व सूचना मागविल्या होत्या. मात्र महिना गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये उलटून गेला आहे. असे असताना १ लाख रुपये कॉर्पस फंडाच्या तरतुदीच्या धोरणाला शासनाकडून मंजुरी मिळेल का?

# वरळीतील पालिकेच्या जागेचा लिलाव थांबवण्याची मागणी

■ मुंबई

**पंचतारांकित हॉटेल उभारण्याचा घाट**



**मुंबई** महापालिकेने वरळीतील दूरदर्शन केंद्राजवळच्या ५१६६ चौरस मीटर म्हणजे ६ एकर मौल्यवान भूखंडाचा लिलाव करण्याचा निर्णय घेतला आहे. यावर विरोधकांनी जोरदार आक्षेप घेतला आहे.हा भूखंड खासगी विकासकाला पंचतारांकित हॉटेलसाठी कवडीमोल भावात देण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप करत हा लिलाव तत्काळ थांबवण्याची मागणी पालिकेतील विरोधी पक्षांनी केली आहे. तसेच या प्रकरणात महापौर रितु तावडे आणि आयुक्त अश्विनी भिडे यांनी तत्काळ हस्तक्षेप करावा, असे आवाहनही केले आहे.

वरळी येथील दूरदर्शन केंद्राजवळ असलेला पालिकेचा साहित्य चाचणी प्रयोगशाळेचा ५,१६६ चौरस मीटरचा हा भूखंड ३० वर्षांच्या करारावर दिला जाणार आहे. हा भूखंड आणखी ३० वर्षांसाठी वाढवण्याची तरतूद आहे. या व्यावसायिक लिलावातून पालिकेला सुमारे ४५५ कोटी रुपये मिळण्याची अपेक्षा आहे. मात्र, निविदा जाहीर झाल्यानंतर मुंबई काँग्रेस अध्यक्षा वर्षा गायकवाड आणि समाजवादी पक्षाचे आमदार रईस शेख यांनी यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. विशिष्ट बिल्डरांच्या फायद्यासाठीच या करारातील अटी तयार करण्यात आल्या आहेत. या जागेवर पंचतारांकित हॉटेल उभारून बिल्डर प्रचंड नफा कमावणार असून, पालिकेचे मात्र नुकसान होणार आहे',असा गंभीर आरोप वर्षा गायकवाड यांनी केला आहे.

# पुणे मेट्रोच्या बोगद्याला छिद्र घरमालकाचा जामीन फेटाळला

■ पुणे

**पुण्यातील** शुक्रवार पेठ परिसरात काही दिवसांपूर्वी अनधिकृत बोअरवेल खोदकामामुळे मेट्रोच्या भुयारी बोगद्याला छिद्र पडले होते. प्रकरणात घरमालक धनंजय मोटे आणि ठेकेदार प्रताप जगताप यांचा अटकपूर्व जामीन अर्ज पुणे न्यायालयाने फेटाळला आहे.

मंडई स्थानकाजवळ परवानगी न घेता सुरू असलेल्या बोअरवेलच्या कामामुळे थेट मेट्रोच्या बोगद्यालाच छिद्र पडून पाणीगळती झाल्याची धक्कादायक घटना घडली होती. या घटनेमुळे बोगद्याला सुमारे सहा इंचाचा खड्डा पडला. संभाव्य धोका लक्षात घेऊन तातडीने दुरुस्ती करण्यात आली आणि मोठा अनर्थ टळला. पण या प्रकारामुळे सार्वजनिक सुरक्षेला गंभीर धोका निर्माण झाला असून, मेट्रोचे अंदाजे अडीच लाखांचे नुकसान झाले आहे. या प्रकरणी महामेट्रोचे संयुक्त महाव्यवस्थापक (सिव्हिल) शंतनु गोरात्रा यांनी खडक पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार खडक पोलिसांनी घरमालक धनंजय मोटे आणि ठेकेदार प्रताप जगताप यांच्याविरोधात गुन्हा नोंदवला आहे.

# कामाठीपुरा पुनर्विकासाला गती दोन विकासकांची केली नेमणूक

**एक कंपनी स्थापन करून प्रकल्प राबविणार**

■ मुंबई

**गेल्या** अनेक वर्षांपासून रखडलेल्या ऐतिहासिक कामाठीपुरा समूह पुनर्विकास प्रकल्पाला आता गती मिळाली आहे. कारण या १०० वर्षे जुन्या इमारतींच्या पुनर्विकासासाठी दोन विकासकांना म्हाडाने स्विकृतीपत्र दिले आहे. या दोन्ही विकासकांना एकच कंपनी स्थापन करून हा प्रकल्प पूर्ण करावा लागणार आहे.

म्हाडाने कामाठीपुरा परिसरातील जुन्या इमारतींच्या समूह पुनर्विकासासाठी भगीरथी हाऊसिंग प्रायव्हेट लिमिटेड आणि माथी डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड या दोन विकासकांना स्वीकृतीपत्र दिले आहे. हे दोन्ही विकासक आता एक कंपनी स्थापन करून तिच्या माध्यमातून पुनर्विकास करतील. या प्रकल्पातून म्हाडालाही घरे उपलब्ध होणार आहेत. या भागातील इमारती १०० वर्षे जुन्या असून, त्या मोडकळीस आल्या आहेत. त्यामुळे या इमारतींचा एकत्रित पुनर्विकास करण्याचा निर्णय म्हाडाच्या इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने घेतला आहे. हा पुनर्विकास प्रकल्प कन्स्ट्रक्शन ॲण्ड डेव्हलपमेंट एजन्सीद्वारे राबविला जाणार आहे.

त्यामध्ये कामाठीपुरा येथील १ ते १५ गल्ल्यांमधील परिसराचा समावेश असणार आहे. हा संपूर्ण परिसर ३४ एकरावर व्यापला आहे. या ठिकाणी ९४३ उपकरप्राप्त इमारती असून, त्यात ६६२५ निवासी आणि १३७६ अनिवासी भाडेकरू, रहिवासी असून ८०० जमीनमालक आहेत.

# धाराशिव जिल्हा नियोजन निधी वाटपात घोटाळा

**उबाठाचा आरोप**

■ धाराशिव

**धाराशिव जिल्हा** नियोजन समितीच्या निधी वाटपात घोटाळा झाल्याचा गंभीर आरोप उबाठाचे आमदार कैलास पाटील यांनी केला आहे. मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीपेक्षा जास्त निधीला मान्यता देण्यात आली. तसेच समितीची अधिकृत मान्यता न घेताच निधीची तरतूद करण्यात आल्याचे त्यांनी म्हटले आहे.

या प्रकरणी उबाठाने राज्य नियोजन विभागाकडे धाव घेतली आहे. या तक्रारीची दखल घेत राज्य नियोजन विभागाने चौकशीचे आदेश दिले असून, संबंधित प्रकरणाचा सविस्तर अहवाल सादर करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. दरम्यान, यापूर्वीही वादामुळे जिल्हा नियोजन समितीच्या निधी वाटपाला स्थगिती देण्यात आली होती. त्यामुळे या नव्या आरोपांमुळे प्रकरण अधिकच गंभीर बनले आहे.

# भांडुपमध्ये महावितरण संकल्पपूर्ती गुणगौरव सोहळा

■ मुंबई



**वीजगळती** कमी करणे आणि देयकांची थकबाकी वसुलीसाठी विशेष प्रयत्न करून महावितरण कंपनीच्या महसूल वाढविण्याचा दृष्टीने भांडुप परिमंडलांतर्गत ज्या मंडळ, विभाग, उपविभागाने चांगली कामगिरी केली. त्यांचा गुणगौरव सोहळा भांडुप येथील जैनम हॉलमध्ये आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून मुख्य कार्यालयाचे कार्यकारी संचालक (२) धनंजय औंढेकर आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष भांडुप परिमंडलाचे मुख्य अभियंता संजय पाटील प्रामुख्याने उपस्थित होते. त्यांच्यासोबत तिन्ही मंडळाचे अधीक्षक अभियंता दीपक पाटील, धनराज बिक्कड व माणिक राठोड (प्रभारी), भांडुप परिमंडलाचे सहाय्यक महाव्यवस्थापक (वि व ले), प्रवीण रहांगदळे व्यासपीठावर उपस्थित होते.

भांडुप परिमंडलांतर्गत चांगली कामगिरी करून व सर्व निकषांआधारे वाशी मंडळाने प्रथम क्रमांक पटकाविले आहे. ठाणे मंडळाने द्वितीय तर पेण मंडळाने तृतीय क्रमांक पटकाविले आहेत. याशिवाय, चांगली कामगिरी केल्यामुळे विभागीय कार्यालयामध्ये वाशी विभागाने प्रथम तर वागळे ईस्टेट विभागाने द्वितीय तर गोरेगाव विभागाने तृतीय क्रमांक पटकाविला आहे.

# एक्सडी कंपनीला एलपीजीचा फटका ४५० कामगारांच्या नोकऱ्या धोक्यात

■ छत्रपती संभाजीनगर

**औद्योगिक** क्षेत्रात एलपीजीच्या तुटवड्यामुळे मोठे संकट निर्माण झाले असून छत्रपती संभाजीनगर येथील उद्योगांना त्याचा फटका बसत आहे. गॅसच्या तुटवड्यामुळे एक्सडी या कंपनीने तब्बल ४५० कर्मचाऱ्यांना कामावरून कमी करण्याच्या नोटिसा दिल्या आहेत.

ही कंपनी चारचाकी वाहनांसाठी क्लच तयार करते. मात्र, उत्पादन प्रक्रियेसाठी आवश्यक असलेला एलपीजी गॅस पुरवठा खंडित झाल्याने सध्या कंपनी केवळ ५० टक्के क्षमतेने चालू आहे. पुढील दोन दिवसांत गॅस पुरवठा सुरळीत न झाल्यास कंपनी बंद करण्याचा इशारा व्यवस्थापनाने दिला आहे, ज्यामुळे ४५० कुटुंबांवर उपासमारीची वेळ येण्याची भीती व्यक्त केली जात आहे. कामगारांनी सांगितले की, क्लच तयार करण्यासाठी लागणाऱ्या पार्ट्सवर 'हार्डनिंग' प्रक्रिया करावी लागते आणि त्यासाठी दरमहा तीन १० टनांचे एलपीजी टँकर आवश्यक असतात.

# खासदार नीलेश लंकेंना दिलासा! सुजय विखेंची याचिका फेटाळली

■ अहिल्यानगर



**अहिल्यानगर** दक्षिण लोकसभा मतदारसंघातील भाजपाचे पराभूत उमेदवार डॉ. सुजय विखे- पाटील यांनी नवनिर्वाचित खासदार नीलेश लंके यांच्या निवडीला आव्हान देणारी याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने फेटाळून लावली. या निर्णयामुळे खासदार नीलेश लंके यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे नीलेश लंके यांनी डॉ. सुजय विखे-पाटील यांचा पराभव केला होता. मात्र, लंके यांनी निवडणुकीत गैरप्रकार केल्याचा आरोप करत विखे यांनी त्यांच्या निवडीला आव्हान देणारी याचिका दाखल केली होती. लोकप्रतिनिधी कायद्यानुसार लंके यांची निवड रद्द करण्याची मागणीही करण्यात आली होती. या प्रकरणाची सुनावणी न्यायमूर्ती किशोर संत यांच्या खंडपीठासमोर झाली. दोन्ही बाजूंचा सविस्तर युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने विखे यांची याचिका फेटाळून लावली. विशेष म्हणजे या याचिकेत विखे यांनी केवळ नीलेश लंके यांनाच प्रतिवादी केले होते. निवडणूक अधिकारी किंवा इतर उमेदवारांना प्रतिवादी करण्यात आले नव्हते. २०२४ मध्ये दाखल झालेली ही याचिका प्रदीर्घ काळ प्रलंबित होती. इतर मतदारसंघांतील अशाच प्रकारच्या याचिका आधीच निकाली निघाल्या असताना, नगरच्या या प्रकरणाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले होते. अखेर न्यायालयाने याचिका फेटाळल्यामुळे लंके यांच्या निवडीवर शिक्कामोर्तब झाले आहे. या निकालामुळे नगरच्या राजकारणात पुन्हा एकदा लंके गटाचे वर्चस्व अधोरेखित झाले असून, विखे गटासाठी हा मोठा कायदेशीर धक्का मानला जात आहे. तसेच, गेल्या अनेक महिन्यांपासून सुरू असलेल्या राजकीय आणि कायदेशीर चर्चांना आता पूर्णविराम मिळाला आहे.

# अक्सा चौपाटीवर जीवरक्षकांनी चार मुलांचे प्राण वाचवले

■ मुंबई

**मुंबईतील** अक्सा चौपाटीवर आज सकाळी साडेसहा वाजताच्या सुमारास चार मुले चौपाटीवर फुटबॉल खेळण्यासाठी आली होती. खेळ संपल्यानंतर त्यांनी समुद्रात पोहण्यासाठी प्रवेश केला. मात्र, ओहोटीचा काळ असल्याने पाण्याचा अचूक अंदाज न आल्याने ती मुले खोल पाण्यात जाऊन बुडू लागली. सकाळी ८ वाजताच्या सुमारास 'दृष्टी लाईफ सेविंग'च्या जीवरक्षकांच्या ही बाब लक्षात आली. परिस्थितीचे गांभीर्य ओळखत त्यांनी तत्काळ बचावकार्य सुरू केले. यावेळी जवळच 'साई राम' बोटीवर मासेमारी करणाऱ्या मच्छिमारांनीही तत्परता दाखवत आपली बोट मदतीसाठी पुढे आणली. जीवरक्षक आणि मच्छिमार यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे चारही मुलांना सुखरूप बाहेर काढण्यात यश आले.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# परिणामशून्य शस्त्रसंधी!

गेले ४०दिवस सुरू असलेला अमेरिका-इराण हा संघर्ष तात्पुरता थांबला आहे असे आज जरी वरकरणी दिसत असले तरीसुद्धा शस्त्रसंधीच्या दुसऱ्याच दिवसापासून इस्त्रायलकडून पुन्हा सुरू झालेले हल्ले या शस्त्रसंधीच्या विश्वासार्हतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण करणारे ठरतात. अमेरिकेने ही शस्त्रसंधी एकतर्फी केलेली आहे असाच त्याचा अर्थ निघतो. इस्त्रायलला विश्वासात घेऊन शस्त्रसंधी करण्याची क्षमता अमेरिकेकडे नाही हेही त्यातून सिद्ध होते. या शस्त्रसंधीचे स्वागत सगळ्या जगभर झाले. परंतु ट्रम्प यांनी यासाठी घातलेली दोन आठवड्यांची मुदत अनेक प्रकारचे प्रश्न निर्माण करणारी ठरते. हे दोन आठवडे ते कशाची वाट पाहणार आहेत याबद्दलही संदिग्धता आहे. ज्या पद्धतीने ट्रम्प यांनी ही शस्त्रसंधी जाहीर केली त्यावरून ट्रम्प यांनी सपशेल माघार घेतल्याचे चित्र जगासमोर आलेले आहे. युद्धातून गेल्या ४० दिवसांत जगभर जे काही वातावरण निर्माण झाले त्याचा फटका अमेरिकेलाही बसू लागला होता. जगभरात तेलाच्या किमती वाढल्या. तर कच्च्या तेलाच्या टंचाईने जगातल्या अनेक देशांची आर्थिक घडी विस्कटायला सुरुवात झाली होती. त्याचे दूरगामी परिणाम अमेरिकेलाही भोगावे लागतील, अशी शक्यता निर्माण झाली होती. इतकेच नव्हे तर प्रत्यक्ष अमेरिकेत सुद्धा ट्रम्प यांच्या या हटवादी भूमिकेविरुद्ध लोकांनी प्रत्यक्ष आंदोलन करायला सुरुवात केली होती. आता ट्रम्प यांची ही राजकीय परिस्थिती त्यांनाच अडचणीत आणणारी ठरू शकते याचा अंदाज त्यांना आला असावा आणि म्हणूनच त्यांनी सुरुवातीला दोन आठवड्यांची शस्त्रसंधी जाहीर करून इराणला आपण विचार करण्यासाठी अवधी देत आहोत असा दावा केलेला आहे. परंतु इराणने या संदर्भात स्पष्ट भूमिका ठेवली. उलट अमेरिकेसमोर १० अटी ठेवून या शस्त्रसंधीला आपण तयार असल्याचे म्हटले आहे. या शस्त्रसंधीमध्ये प्रमुख अट म्हणजे होर्मूज सामुद्रधुनीतून ज्या काही जहाजांचा व्यापार होईल त्यावर इराणला इतर देशांना योग्य ती ड्युटी द्यावी लागेल अशा प्रकारची अट आहे. शिवाय इराणने सुरू ठेवलेला अण्वस्त्र प्रसाराचा कार्यक्रम तसाच चालू ठेवण्याचीही मागणी या अटींमध्ये सर्वात महत्त्वाची ठरते. याचा अर्थ ज्या कारणांसाठी युद्ध सुरू झाले होते त्या कारणांना इराणने धुडकावून लावलेले आहे. कारण इराणमधले सरकार हे लोकशाहीविरोधी सरकार आहे, ते दहशतवादाला प्रोत्साहन देते आणि अण्वस्त्र प्रसाराची इराणने घेतलेली भूमिका ही जगासाठी धोकादायक ठरू शकते अशा प्रकारची भूमिका घेऊन ट्रम्प यांनी इराणविरुध्द हल्ले सुरू केले होते. त्यातून इराणमध्ये सत्तांतर घडवून आणायचे आणि आपल्या अटी नव्या सरकारने स्वीकारायच्या अशी व्यूहरचना ट्रम्प यांची होती. परंतु ४० दिवसांच्या युद्धामध्ये यापैकी कोणतीही गोष्ट प्रत्यक्षात येऊ शकलेली नाही.

### संधी झाली तरी संघर्ष सुरूच

या चाळीस दिवसांचा समाजव्यवस्थेवर आणि अर्थव्यवस्थेवर प्रचंड गंभीर परिणाम झालेला आहे. जवळपास ३००० लोकांचे बळी घेणारे हे युद्ध आणि इराणला उद्ध्वस्ततेच्या उंबरठ्यावर आणून ठेवण्याचे काम या युद्धाने केल्याने पुढचा बराच काळ इराणला आपली ही सगळी परिस्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न करावे लागणार आहे. आता या दोन आठवड्याच्या कालावधीमध्ये ट्रम्प यापेक्षा फार वेगळी भूमिका घेतील असे वाटत नाही आणि ही शस्त्रसंधी पुढे चालू राहील असा देखील अनेकांचा कयास आहे. परंतु ज्या पद्धतीने शस्त्रसंधीच्या रात्रीच इस्त्रायलने केलेले हल्ले आणि इराणच्या काही तेलसाठ्यांवर होत असलेले हल्ले या सगळ्या गोष्टी लक्षात घेतल्या तर शस्त्रसंधी जरी असली तरी संघर्ष चालूच राहील. कारण आज दोन्ही देशांमध्ये प्रचंड अविश्वास आहे आणि दोघांमध्येही एकमेकांविरुद्धच्या सूडाची आग धुमसणारी आहे. मात्र एकूण अमेरिकेची राजकीय स्थिती आणि आर्थिक परिस्थिती या सगळ्यांचा विचार करता या दोन आठवड्यांनंतरही अमेरिकेला पुन्हा नमते घ्यावे लागण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही. थोडक्यात सांगायचे तर शून्य परिणाम साधणारे हे युद्ध होते आणि त्यातून झालेली ही शस्त्रसंधी सुद्धा एकाअर्थी परिणामशून्यच म्हणावी लागेल.

### भारताची प्रतिक्रिया

या शस्त्रसंधीचे भारताने स्वागत केले आहे आणि ते करणे आवश्यकही होते. गेल्या ४० दिवसांमध्ये भारतासारख्या सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या देशाला त्याचा बऱ्यापैकी फटका बसला होता. विशेषत: तेलसाठ्यावर झालेला गंभीर परिणाम आणि देशांमध्ये निर्माण झालेली तेलटंचाई हे त्याचे निदर्शक होते. स्वाभाविकपणे अनेक प्रकारच्या अर्थव्यवहारांवर त्याचा गंभीर परिणाम होऊ लागल्याने अर्थव्यवस्था सुद्धा अडचणीत आल्याचे चित्र निर्माण झाले होते. गेल्या ४० दिवसांमध्ये शेअर बाजार अनेक वेळा कोलमडला. मात्र शस्त्रसंधी जाहीर झाल्याबरोबर हाच शेअर बाजार उसळून वरती आल्याचे पाहायला मिळते. याचा अर्थ या युद्धाचे बरेच गंभीर परिणाम भारताला सोसावे लागलेले आहेत. हे युद्ध थांबणे हे भारताच्या हिताचे होते. या युद्धात पाकिस्तानने मध्यस्थी केल्याची चर्चा आहे. परंतु इराणने स्वतः या मध्यस्थीचा इन्कार केल्याची पोस्ट तिथल्या इराण सरकारकडून जाहीर झालेली आहे. पाकिस्तानने युद्ध थांबावे म्हणून केलेले आवाहन हा एक स्वतंत्र भाग ठरतो आणि पाकिस्तानच्या मध्यस्थीमुळे युद्ध थांबले असे चित्र निर्माण करणारा पाकिस्तानचा हा डाव केवळ स्वतःची प्रतिमा जपण्यासाठी केलेला अट्टाहास देखील ठरतो असे देखील इराणच्या या इन्कारावरून स्पष्ट होते. पाकिस्तान आज इतक्या मोठ्या स्थितीत नाही की, त्याच्या मध्यस्थीचा स्वीकार केला जाऊ शकतो. पाकिस्तान जाणीवपूर्वक आपण मध्यस्थी केल्याचे चित्र निर्माण करतो आहे. परंतु केवळ एखादा प्रस्ताव अमेरिकेकडे पाठवला म्हणजे मध्यस्थी होत नाही. इराणची बाजू घेऊन पाकिस्तान मध्यस्थी करण्याचा प्रयत्न करत होता. परंतु अमेरिकेने त्याला तितकेसे महत्त्व दिले नाही. आता केवळ अमेरिकेतील बदलती आर्थिक स्थिती आणि राजकीय स्थिती लक्षात घेऊनच प्रत्यक्ष ट्रम्प यांना युद्धविराम करण्याशिवाय पर्याय उरलेला नव्हता. अन्यथा एकूणच त्यांना अमेरिकेतच मोठा विरोध सहन करावा लागला असता. स्वाभाविकपणे या युद्धविरामामागे ट्रम्प यांच्या राजकीय भवितव्याचेही एक मोठे कारण आहे हे नाकारता येणार नाही.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

कोण कसा असावा हे आपण ठरवू शकत नसलो तरी,
आपण त्याच्याशी कसं वागावं हे मात्र ठरवू शकतो.

## पंचांग

**शुक्रवार १० एप्रिल २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**
*** चैत्र कृष्ण अष्टमी**
**नक्षत्र - पूर्वाषाढा**
**जन्मराशी :-**
**००-०१ ते १८-०२ धनु**
**१८-०३ ते २४-०० मकर**



**रवी उदय- ०६-२७,**
**रवी अस्त- १८-५४**

**कालाष्टमी, मळगंगा यात्रा - निधोज**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४


Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती




### ज्वारीचे आंबिल

**उन्हाळ्यात शरीर थंड ठेवण्यासाठी आणि पचनास उत्तम असलेले ज्वारीचे आंबिल हा एक पारंपारिक व पौष्टिक पर्याय आहे. उन्हाळ्यात शरीराला थंडावा देण्यासाठी रोज प्यायला उत्तम.**



★**साहित्य :** २ चमचे ज्वारीचे पीठ, १/२ कप पाणी, १/२ कप ताक, मीठ चवीनुसार, १/२ टीस्पून जिरे, कोथिंबीर, दोन हिरव्या मिरच्या, लसणाच्या पाकळ्या ३-४, अगदी छोटा तुकडा आले, पुदिना ४-५ पाने. १/२ चमचा तेल.

★**कृती :** एका भांड्यात ज्वारीचं पीठ घेऊन त्यात ताक घालून गाठी न राहता नीट मिसळा. हिरवी मिरची, कोथिंबीर, जिरे, आले आणि लसूण टाकून जाडसर कुटून घेणे. गॅसवर कढई ठेऊन त्यात कुटलेला मसाला टाकावा. ते थोडे परतल्यावर त्यात पाणी टाकावे. पाणी गरम झाले की, त्यात ज्वारीच्या पिठाचे मिश्रण घालावे. हे सतत हलवत राहावे जेणेकरून त्यात गुठळ्या होणार नाही. चवीनुसार मीठ टाकावे, ५-८ मिनिटे शिजू द्यावे. मिश्रण घट्ट झाल्यावर गॅस बंद करा आणि थंड होऊ द्या. प्यायला देताना वरून पुदीन्याची पाने टाकावी. हे आंबिल थंड करून प्यायला अजूनच चविष्ट लागते.




# लखनौचा अखेरच्या चेंडूवर ३ विकेटने विजय

## मुकुलच्या वादळी खेळीमुळे कोलकाता पराभूत

**कोलकाताच्या ईडन गार्डनवर आज झालेल्या आयपीएलच्या १५ व्या सामन्यात लखनौ सुपर जायंट्सने कोलकाता नाईट रायडर्सला ३ विकेट शिल्लक राखून पराभूत केले. लखनौचा हा दुसरा विजय आहे. कोलकाताने लखनौला विजयासाठी १८२ धावांचे आव्हान दिले होते. मात्र हे आव्हान २१ वर्षीय मुकुल चौधरीने (२७ चेंडूत ५४) अखेरच्या ५ षटकांत अफलातून वादळी खेळी केल्यामुळे लखनौने सामन्याच्या शेवटच्या चेंडूवर पूर्ण केले.**



■ कोलकाता

**प्रथम** फलंदाजी करताना कोलकाताचा पहिला बळी फिन ॲलनच्या रुपात गेला. त्याने ८ चेंडूत फक्त ८ धावा केल्या. कर्णधार अजिंक्य रहाणे आणि रघुवंशी यांनी डाव सावरत संघाची धावसंख्या १०.१ षटकांत १ बाद ९९ वर नेली. मग रहाणे मोठा फटका मारण्याच्या नादात दिग्वेश राठीच्या गोलंदाजीवर झेलबाद झाला. त्याने २४ चेंडूत २ षटकार आणि ४ चौकारांसह ४१ धावा केल्या. मग रघुवंशी आणि रिंकू सिंग एकामागून एक तंबूत परतले. कोलकाताने निर्धारित षटकात ४ बाद १८१ धावापर्यंत मजल मारली. या धावसंख्येचा पाठलाग करताना लखनौने ४ षटकांत ४१ धावांचा टप्पा गाठला. मात्र एडन मार्कराम १५ चेंडूत २२ धावांवर झेलबाद झाला. मिचेल मार्श १५ आणि कर्णधार ऋषभ पंत १० धावा करून माघारी परतला. आयुष बडोनी आणि निकोलस पूरन यांची जोडी जमली असे वाटत असताना कार्तिक त्यागीच्या गोलंदाजीवर पूरन १५ चेंडूत १३ धावांवर बाद झाला. २ धावांवर खेळत असलेल्या अब्दुल समदचा अनुकूल रॉयने त्रिफळा उडवला. मात्र मुकुल चौधरीची साथ घेऊन आयुष बडोनी एका बाजूने चांगले फटके मारत होता. ३३ चेंडूत अर्धशतक पूर्ण केल्यानंतर बडोनी अतिशय खराब फटका मारून झेलबाद झाला. फिरकीपटू सुनील नरेनने मोहम्मद शमीला झेलबाद केले. त्यानंतर लखनौला विजयासाठी २४ चेंडूत ५४ धावांची गरज होती. मुकुल चौधरीने १८ व्या षटकात १३ धावा ठोकल्या. कॅमेरॉन ग्रीनच्या १९ व्या षटकात मुकुलने दोन षटकार आणि एक चौकार ठोकला. त्याच्या खेळीमुळे लखनौला विजयीसाठी शेवटच्या ६ चेंडूत १४ धावांची आवश्यकता होती. वैभव अरोराच्या २० व्या षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर मुकुलने षटकार आणि तिसऱ्या आणि चौथ्या चेंडूवर धाव निघाली नाही. पाचव्या चेंडूवर मुकुलने अफलातून षटकार ठोकला. शेवटच्या चेंडूवर विजयासाठी एका धावेची गरज होती आणि मुकुलने एक धाव काढल्याने लखनौने हा सामना ३ विकेटने जिंकला.

## दादरमध्ये आंतर बँक कॅरम आणि बुद्धिबळ स्पर्धा

■ मुंबई

**को-ऑपरेटिव्ह** बँक एम्प्लॉईज युनियनतर्फे आयोजित आंतर को-ऑपरेटिव्ह बँक कॅरम आणि बुध्दिबळ स्पर्धेत सहकारी बँकांमधील कॅरम आणि बुद्धिबळपटूमध्ये ११ एप्रिलला दादर (प.) येथे चुरस राहील. या स्पर्धेत कोकण बँक, ग्रेटर बँक, अपना बँक, म्युनिसिपल बँक, हिंदुस्तान बँक, मुंबै बँक आदी सहकारी बँकांचे खेळाडू सहभागी होणार आहेत.

## कुर्ला पश्चिममध्ये आजपासून कबड्डी स्पर्धा

■ मुंबई

**कुर्ला** पश्चिममधील मुंबई पब्लिक स्कूल मागे, पिंपळेश्वर हनुमान मंदिर शेजारी गांधी मैदान येथे १० ते १२ एप्रिल या कालावधीत सायंकाळी ६ वाजल्यापासून अजित पवार यांच्या स्मरणार्थ गौरी शंकर क्रीडा मंडळ आणि हनुमान क्रीडा मंडळाच्या संयुक्त विद्यमाने कुर्ला क्रीडा केंद्राच्या माध्यमातून प्रथम श्रेणी पुरुष गट आणि कुमार गटाची कबड्डी स्पर्धा होणार आहे.

## वेटरन्स मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत श्वेता, पल्लवीला कांस्य

मडगाव- गोव्याच्या मडगाव येथील मनोहर पर्रिकर क्रीडा संकुलात बॅडमिंटन असोसिएशन ऑफ इंडियाने आयोजित केलेल्या वेटरन्स मास्टर्स राष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेत मुंबईच्या श्वेता ठाकूर आणि पल्लवी मित्तल या दोघींनी कांस्य पदकाची कमाई केली. ३५ वर्षांवरील मिश्र दुहेरी वयोगटात श्वेता ठाकूरने अभिनव प्रकाशसोबत कांस्यपदक मिळविले. उपांत्य फेरीत केरळच्या मोहम्मद रेहान-अनिस कौसर यांच्याकडून ठाकूर, प्रकाश जोडीला पराभव पत्करावा लागला.

## वरळीत कबड्डी स्पर्धा

■ मुंबई

**ओम** ज्ञानदीप मंडळाच्या वतीने १४ ते १७ एप्रिल या कालावधीत हंगामातील पहिल्या व्यावसायिक पुरुष गट कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.वरळी स्पोर्ट्स क्लबच्या मैदानावरील मॅटच्या २ क्रीडागणांवर ही स्पर्धा सायंकाळी खेळविण्यात येईल.

**जाहीर सूचना**

श्री. समीर गुप्ता आणि सौ. अनिता गुप्ता यांनी माझे अशील झिरकोनियम केमिकल्स प्रा. लि. यांना असे सांगितले आणि खात्री दिली आहे की;
नोंद घ्यावी की, श्री. संजीव अगरवाल आणि सौ. प्रिया एस. अगरवाल ("खरेदीदार") यांनी सर्वप्रथम दिनांक २५.९.२००९ रोजीच्या विक्री करारपत्र, त्याच दिवशी संयुक्त उप-निबंधक कुर्ला क्र. ३ कडे क्र. बीडीआर/३/७७७४/२००९ अन्वये नोंदणीकृत, द्वारे मे. कॉंक्रिट बिल्डर्स ("प्रवर्तक") यांच्याकडून महसूल गाव देवनारचा सी.टी.एस. क्र. ३३७/१ धारण केलेल्या मुंबई उपनगर जिल्ह्याच्या जिल्हा आणि नोंदणीकरण उप-जिल्ह्यामधील बृहन्मुंबईच्या हद्दीमधील देवनार गाव, देवनार, मुंबई ४०००८८ येथे स्थित "साई समर्थ" या इमारतीच्या ३ऱ्या मजल्यावरील कार्यालय क्र. ३०२, मोजमाप अदमासे ९२१.२३ चौ.फू. (कार्पेट क्षेत्रफळ) आणि निश क्षेत्रफळ मोजमाप अदमासे १६८.०९ चौ.फू. या व्यावसायिक जागेच्या संदर्भात मालकीहक्क तत्त्वावर सर्व हक्क शीर्षक हितसंबंध मोबदला देऊन संयुक्तरित्या खरेदी करण्याचे मान्य केले होते आणि त्यानुसार दि. २७ फेब्रुवारी, २०१२ रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० अन्वये क्र. एमयूएम/डब्ल्यूएम/जीएनएल/(ओ)/१०३१५/२०१०-२०११ दिनांक ०८.०९.२०१० अन्वये नोंदणीकृत "साई समर्थ कमर्शियल प्रिमायसेस को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड" चे सदस्यत्व आणि भाग प्रमाणपत्र क्र. ०११ मध्ये समाविष्ट डिस्टिंक्टिव्ह क्र. १५११ ते १६० धारण केलेल्या रु. ५०/- प्रत्येकीचे १० पूर्णतः भरणा केलेले समभाग (एकत्रितरित्या "मालमत्ता") स्वीकारले. त्यानुसार दोघेही सदर मालमत्तेच्या मालकीहक्काचे संयुक्तरित्या आणि पुरेसे हक्कदार बनले.
त्यानंतर दिनांक २२.०४.२०१० रोजीचे विक्री करारपत्र, त्याच दिवशी संयुक्त उप-निबंधक, कुर्ला क्र. ३ यांच्याकडे क्र. बीडीआर/३/४७००/२०१० अन्वये नोंदणीकृत, द्वारे सदर श्री. संजीव अगरवाल आणि सौ. प्रिया एस. अगरवाल ("विक्रेते") यांनी सदर मालमत्ता सौ. भावना गुप्ता आणि सौ. अनिता गुप्ता ("खरेदीदार") यांना मोबदला घेऊन विक्री हस्तांतरित अभिहस्तांकित करण्याचे मान्य केले. म्हणून दि. २५.०६.२०२३ रोजी सदर संस्थेने सदर संस्थेचे सदस्यत्व सौ. भावना गुप्ता आणि सौ. अनिता गुप्ता यांना आणि त्यांच्या नावे हस्तांतरित केले, त्याद्वारे दोघीही सदर मालमत्तेच्या मालकीहक्काच्या संयुक्तरित्या आणि पुरेशा हक्कदार बनल्या.
सदर सौ. भावना गुप्ता यांचे कोणतेही मृत्युपत्र न बनविता दि. ०७.११.२०१५ रोजी दक्षिण दिल्ली येथे निधन झाले, त्यांच्या पश्चात महसूल विभाग, दिल्लीच्या एनसीटी शासनाच्या तहसिलदार यांच्याद्वारे मंजूर हयात सदस्य प्रमाणपत्र क्र. ९०६६००००३०३८१७ दिनांक १३.१०.२०२५ नुसार उत्तराधिकारानुसार त्यांचे पती श्री. समीर गुप्ता आणि मुलगा राघव गुप्ता आणि सिद्धांत गुप्ता हे केवळ हयात वारस आणि कायदेशीर प्रतिनिधी आहेत आणि त्यानुसार दिवंगत भावना गुप्ता यांच्या सदर मालमत्तेमधील अविभक्त ५०% हिस्सा हक्क शीर्षक हितसंबंधांचे हक्कदार आहेत.
म्हणून येथील पक्षकारांच्या दरम्यान परस्पर सामंजस्यानुसार झिरकोनियम केमिकल्स प्रा. लि. ला सांगितलेल्या विशिष्ट कालमर्यादेमध्ये नोंदणी करावयाच्या हक्कसोड करारपत्राद्वारे, श्री. राघव गुप्ता आणि सिद्धांत गुप्ता ("हक्क सोडणारे") यांनी सदर मालमत्तेमधील दिवंगत भावना गुप्ता यांच्या अविभक्त ५०% हिश्शामधील त्यांचे अविभक्त २/३ पिढीजात हिस्सा हक्क शीर्षक हितसंबंध श्री. समीर गुप्ता ("हक्क प्राप्त करणारे") ज्यांच्या नावे सौ. अनिता गुप्ता यांच्यासह सदस्यता दि. २५.०७.२०२३ रोजी हस्तांतरित करण्यात आली, त्यांना आणि त्यांच्या नावे सोडण्याचे त्याग करण्याचे मान्य केले होते.
त्यानुसार, श्री. समीर गुप्ता आणि सौ. अनिता गुप्ता सर्व बोज्यांपासून मुक्त सदर मालमत्तेच्या मालकीहक्कासह ताबा सतत अखंड वापर भोगवटा उपभोग घेण्यास संयुक्तरित्या हक्कदार आहेत आणि त्यानुसार दोघांनी ते झिरकोनियम केमिकल्स प्रा. लि. यांना त्या दोघांच्या दरम्यान मान्य मोबदला आणि अटी व शर्तीनुसार विक्री हस्तांतरण अभिहस्तांकन मान्य करण्यास तयार झाले.
कोणा व्यक्ती किंवा व्यक्तींचा सदर मालमत्ता किंवा तिच्या कोणत्याही भागामध्ये वर विरुद्ध किंवा त्या संदर्भात कोणताही हक्क शीर्षक हितसंबंध दावा किंवा मागणी असल्यास त्यांनी ती मला मूळ दस्तऐवजांच्या समर्थनासह लेखी स्वरुपात सदर प्रसिद्धीपासून १४ (चौदा) दिवसांच्या कालावधीमध्ये कळवणे आवश्यक आहे, असे न केल्यास असे समजण्यात येईल की, सदर मालमत्ता किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या संदर्भात असे कोणतेही दावे किंवा मागण्या अस्तित्वात नाहीत, आणि त्या, जर असल्यास, विक्री, हस्तांतरित केल्या, सोडल्या, त्याग केल्या असे समजण्यात येईल आणि सर्व हेतू आणि कारणांकरिता सोडून दिल्या त्याग केल्या असे समजण्यात येईल आणि त्यानुसार झिरकोनियम केमिकल्स प्रा. लि. यांच्या नावे अपेक्षित विक्री पूर्ण करण्यात येईल.
मुंबई, दिनांक १० एप्रिल, २०२६

सही/-
प्रशांत एम. पाषाणकर
ॲडव्होकेट, उच्च न्यायालय
५१५, सर विठ्ठलदास चेंबर्स, १६,
मुंबई समाचार मार्ग, फोर्ट,
मुंबई ४००००१.

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**निविदा सुचना**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, कवठे महांकाळ विभागीय कार्यालय अंतर्गत उच्चदाब वाहिनी, लघुदाब वाहिनी व रोहीत्र प्रतिबंधात्मक देखभाल व दुरुस्ती कामासाठी निविदा मागविण्यात येत आहेत. वरील निविदा ई-निविदा पध्दतीनेच भरता येतील. सदर निविदा करारासाठी मान्यता प्राप्त नामांकित परवानाधारक विद्युत ठेकेदारांसाठी ई-निवीदा खालील प्रमाणे महावितरण कंपनीच्या संकेत स्थळावर **https://etender.mahadiscom.in/eatApp/#** वर दि. १०.०४.२०२६ पासुन उपलब्ध आहेत. निविदा सादर करणेची अंतीम तारीख २०.०४.२०२६.

| Sr.No. | Tender | EMD Amount |
|---|---|---|
| 1 | EE/KM/PM/T-01/26-27 | Rs.48000/- |

संपर्क – अतिरिक्त कार्यकारी अभियंता, महावितरण, विभाग कवठे महांकाळ
मोबाईल क्र. – ७८७५७६९६६४
**PRO/KOPZ/10/2026-27** कार्यकारी अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्या, विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ

**फॉर्म नं. INC-25A**

सार्वजनिक कंपनी खाजगी कंपनीत रुपांतरण करण्याकरिता वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेली जाहिरात
**प्रादेशिक निर्देशक, पश्चिम क्षेत्र, कंपनी व्यवहार मंत्रालय, च्या समक्ष**
**(५ वा मजला, एव्हरेस्ट, १०० मरीन ड्राईव्ह, मुंबई - ४००००२)**
कंपनी कायदा, २०१३ चे कलम १४ आणि
कंपनी (नोंदणीकरण) नियम, २०१४ च्या नियम ४१ प्रमाणे
व
**सेंटेनीयल फॅब्रिक्स लिमिटेड**, जिचे **नोंदणीकृत कार्यालयः** ६१२, वीणा किल्लेदार इंडस्ट्रीयल इस्टेट, १०-१४, पायस स्ट्रीट, भायखळा (पश्चिम), मुंबई, महाराष्ट्र - ४०००११, (CIN: U15140MH1992PLC067344) च्या बाबतीत
....अर्जदार

याद्वारे **सूचना** देण्यात येते की, **दिनांक २ एप्रिल, २०२६** रोजी सभासदांच्या विशेष सर्वसाधारण सभेत संमत झालेल्या विशेष ठरावानुसार, कंपनीचे खाजगी कंपनीत रुपांतरण करण्याच्या प्रक्रियेला पुष्टी देण्यासाठी एक अर्ज कंपनी कायदा २०१३ च्या कलम १४ अन्वये केंद्र सरकारकडे करू इच्छिते.
या रुपांतरणामुळे कोणाही व्यक्तीच्या हितास काही बाधा येत असल्यास अशा व्यक्तीने आपला आक्षेप, विरोधाची कारणे, स्वतःचे नाव व प्रतिज्ञापत्रासह, नोंदणीकृत पत्राद्वारे **प्रादेशिक निर्देशक, पश्चिम क्षेत्र, कंपनी व्यवहार मंत्रालय, ५ वा मजला, एव्हरेस्ट, १०० मरीन ड्राईव्ह, मुंबई, महाराष्ट्र - ४००००२** येथे ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत पाठवावीत वा पाठविण्याची व्यवस्था करावी व त्याची एक प्रत अर्जदार कंपनीच्या वर नमूद केलेल्या पत्त्यावर पाठवावी.

अर्जदारासाठी आणि त्यांच्या वतीने
जगदीश डोकवाल
संचालक
(डीआयएनः ००२०५१२४)
दिनांकः ०९.०४.२०२६
ठिकाणः मुंबई
रामेश्वर मीडिया

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**जाहिर निवेदन**

डोंबिवली विभागातील ठेकेदारांना सुचित करण्यात येते की, निवेदनासोबत जमा केलेली कार्यदिशानुसार संबंधित ठेकेदारांच्या देयकातून दि. ३१.०३.२०२४ पर्यंतच्या कालावधींची अनामत रक्कम **(EMD)** व दि. ३१.०३.२०२३ पर्यंतच्या कालावधींची सुरक्षा ठेव **(SD)** (रोख, ऑनलाईन अथवा देयकातून वळते केलेली) डोंबिवली विभाग या कार्यालयास जमा आहे. सदर रक्कमेच्या परताव्यासाठी ठेकेदारांनी त्यांचा अर्ज व त्यासोबत लागणारे कागदपत्रे या कार्यालयास दि. २०.०४.२०२६ पर्यंत सादर करावेत. अन्यथा सदर ठेकेदारांची सुरक्षा ठेव रक्कम व अनामत रक्कम ही म.रा.वि.वि.कं. मर्यादित च्या नियमानुसार कंपनीच्या खात्यात जमा करण्यात येईल. तसेच मुदतीनंतर केलेला दावा देय असणार नाही याची संबंधितांनी कृपया नोंद घ्यावी.

कार्यकारी अभियंता
डोंबिवली (ना) विभाग, म.रा.विज. वितरण कं.मर्यादित.

**फॉर्म ए**
**जाहीर घोषणा**
**(इन्सॉल्व्हन्सी अँण्ड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (कॉर्पोरेट व्यक्तिंकरिता दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया) विनियमन, २०१६ चे विनियमन ६ अन्वये)**

**ट्रान्सकॉन बिल्डकॉन प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता**

**संबंधित तपशिल**

| | | |
|---|---|---|
| १ | कॉर्पोरेट ऋणकोचे नाव | **ट्रान्सकॉन बिल्डकॉन प्रायव्हेट लिमिटेड** पॅन : AADCT5661L |
| २ | कॉर्पोरेट ऋणकोची स्थापना तारीख | ०९ ऑगस्ट, २०१० |
| ३ | ज्या प्राधिकरणाअंतर्गत कॉर्पोरेट ऋणकोची स्थापना/नोंदणीकरण झाले आहे | कंपनी निबंधक, मुंबई |
| ४ | कॉर्पोरेट ऋणकोचे कॉर्पोरेट ओळख क्र. | U45200MH2010PTC206380 |
| ५ | कॉर्पोरेट ऋणकोचे नोंदणीकृत कार्यालय व प्रधान कार्यालयाचा (काही असल्यास) पत्ता | प्लॉट क्र. ९४ ते १०३, १०६ (भाग), साईट ऑफिस, खोतवाडी, पी.एम. मार्ग, मिलन इंटरनॅशनल हॉटेलजवळ, सांताक्रूझ (पश्चिम), मुंबई शहर, महाराष्ट्र, भारत - ४०००५४ |
| ६. | कॉर्पोरेट ऋणकोच्या संदर्भात दिवाळखोरी सुरू होण्याची तारीख | ६ एप्रिल २०२६ (आयआरपी ला ८ एप्रिल २०२६ रोजी प्राप्त झालेल्या आदेशाची प्रत) |
| ७. | दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया बंद होण्याची अंदाजित तारीख | ०३ ऑक्टोबर २०२६ |
| ८. | अंतरिम ठराव व्यावसायिक म्हणून कार्यरत दिवाळखोर व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणी क्रमांक | **नावः** अमित विजय कारिया **नोंद. क्र.:** IBBI/IPA-001/IP-P-02600/2021-2022/13969 एएफए क्र.: एए१/१३९६९/०२/३११२२६/१०८५८४ ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत वैधता |
| ९. | बोर्डाकडे नोंदणीकृत अंतरिम ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ई-मेल | **नोंदणीकृत पत्ताः** ४०५, हिंद राजस्थान इमारत, डी.एस. फाळके मार्ग, दादर पूर्व, मुंबई - ४०००१४ ईमेलः ipamitkaria@gmail.com |
| १०. | अंतरिम ठराव व्यावसायिकांशी पत्रव्यवहार करण्यासाठी पत्ता आणि ई-मेल वापरला जाईल | **पत्रव्यवहाराचा पत्ताः** नोंदणीकृत पत्त्याप्रमाणेच **पत्रव्यवहाराचा ई-मेल आयडीः** cirp.transconbuildcon@gmail.com |
| ११. | दावा सादर करण्याची अंतिम तारीख | २२ एप्रिल २०२६ (आयआरपी ला आदेशाची प्रत प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत) |
| १२. | कलम २१ च्या उपकलम (६अ) च्या खंड (ब) अंतर्गत, जर असेल तर, अंतरिम ठराव व्यावसायिकाद्वारे निश्चित केलेले धनकोंचे वर्ग | सार्वजनिकरित्या उपलब्ध असलेल्या माहितीनुसार, कॉर्पोरेट कर्जदाराचा कोणताही स्थावर मालमत्ता प्रकल्प सध्या सुरू नाही. |
| १३. | वर्गातील कर्जदारांचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्यासाठी ओळखल्या गेलेल्या दिवाळखोर व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गासाठी तीन नावे) | **लागू नाही** जर धनकोंचा कोणताही वर्ग त्यानंतर निश्चित झाला, तर नियमांनुसार अधिकृत प्रतिनिधीची नियुक्ती यथोचितपणे करण्यात येईल. |
| १४. | (अ) संबंधित फॉर्म आणि (ब) अधिकृत प्रतिनिधींचे तपशील येथे उपलब्ध आहेत: | (अ) दावा अर्ज डाउनलोड करण्यासाठी वेब लिंक: www.ibbi.gov.in/downloadforms.html (ब) पत्रव्यवहारासाठी ईमेल आयडी: cirp.transconbuildcon@gmail.com |

याद्वारे सूचित करण्यात येते की, **राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठा**ने आदेश क्र.सीपी(आयबी)/६९७(एमबी)२०२५ अन्वये, दिनांक ६ एप्रिल २०२६ रोजी ट्रान्सकॉन बिल्डकॉन प्रायव्हेट लिमिटेडची कॉर्पोरेट दिवाळखोरी निवारण प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. सदर आदेशाची प्रत दिनांक ८ एप्रिल २०२६ रोजी प्राप्त झाली.
**ट्रान्सकॉन बिल्डकॉन प्रायव्हेट लिमिटेड**च्या धनकोंना येथे आवाहन करण्यात येते की त्यांनी त्यांचे दावे पुराव्यांसह **२२ एप्रिल २०२६** रोजी किंवा त्यापूर्वी बाब क्र.१० विरुद्ध नमूद केलेल्या पत्त्यावर अंतरिम रिझोल्यूशन प्रोफेशनलकडे सादर करावेत. वित्तीय धनकोंनी त्यांचे दावे पुराव्यासह इलेक्ट्रॉनिक माध्यमातूनच सादर करावेत. इतर सर्व धनको पुराव्यासह वैयक्तिकरित्या, पोस्टाने किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमातून दावे सादर करू शकतात.
***दाव्याचे खोटे किंवा दिशाभूल करणारे पुरावे सादर केल्यास दंड आकारला जाईल.***

**अमित विजय कारिया**
**अंतरिम ठराव व्यावसायिक**
**ट्रान्सकॉन बिल्डकॉन प्रायव्हेट लिमिटेड**
**नोंदणी क्र.: IBBI/IPA-001/IP-P-02600/2021-2022/13969**
**एएफए क्र.: एए१/१३९६९/०२/३११२२६/१०८५८४ वैधता ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत**
**दिनांक: १० एप्रिल २०२६**
**ठिकाण: मुंबई**

# मुंबईची हवेची गुणवत्ता सुधारली प्रदूषणात १७ टक्क्यांची घट

■ मुंबई

२०२६ च्या पहिल्या तिमाहीत मुंबईतील हवेच्या गुणवत्तेत लक्षणीय सुधारणा झाल्याचे नोंदवण्यात आले आहे. अधिकृत आकडेवारीनुसार, हवेतील प्रदूषणाचे प्रमाण सुमारे १७ टक्क्यांनी घटले असून, मागील तीन वर्षांतील ही सर्वात स्वच्छ हवा मानली जात आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि राज्य प्रदूषण नियंत्रण यंत्रणांनी दिलेल्या माहितीनुसार, धूळकण म्हणजेच सूक्ष्म कण (पीएम २.५) आणि स्थूल कण (पीएम १०) यांच्या पातळीत घट झाल्याने हवेचा दर्जा सुधारला आहे. तज्ज्ञांच्या मते, बांधकामांवर ठेवलेले नियंत्रण, रस्ते स्वच्छता मोहिमा आणि औद्योगिक उत्सर्जनावर केलेली कडक कारवाई यांचा या सुधारणेमागे मोठा वाटा आहे.

# पुणे महापालिकेत गोंधळ उपआयुक्तांना धक्काबुक्की

**पुणे** - महापालिकेतील सांस्कृतिक विभागाच्या उपआयुक्त आशा राऊत यांच्याशी एका महिलेने शिवीगाळ करत धक्काबुक्की केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी संबंधित महिलेविरोधात शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कविता पटेकर नावाच्या महिलेने उपआयुक्तांच्या दालनात जाऊन वाद घातला. तिच्या कामासंदर्भातील फाईल मागील महिनाभर प्रलंबित असल्याचा आरोप करत तिने संताप व्यक्त केला.

# भारतीय माजी क्रिकेटपटू गोपीनाथ यांचे निधन

**चेन्नई** - भारताच्या पहिल्या कसोटी विजेत्या संघाचे सदस्य सी.डी. गोपीनाथ यांचे आज वयाच्या ९२ व्या वर्षी निधन झाले. ते भारतातील सर्वात वयस्कर कसोटी क्रिकेटपटू आणि जगातील दुसरे सर्वात वयस्कर माजी खेळाडू होते. त्यांचा १ मार्च १९३० रोजी मद्रास (आताचे चेन्नई) येथे जन्म झाला होता. त्यांनी टेनिस, हॉकी, फुटबॉल यांसारख्या विविध खेळांमध्ये हात आजमावला होता. मात्र मद्रास ख्रिश्चन कॉलेजमध्ये शिकत असताना वयाच्या १७ व्या वर्षी क्रिकेट खेळायला सुरुवात केली होती. यावेळी त्यांनी झपाट्याने प्रगती केली होती.

# आसाम, केरळ आणि पुद्दुचेरीमध्ये भरघोस मतदान

पान १ वरून

व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कार्बी आंगलोंग जिल्हा प्रशासनाच्या निर्देशानुसार हा प्रकार आला. सोशल मीडियावर एका मतदान केंद्रातील प्रक्रियेचा व्हिडिओ व्हायरल झाला. मतदानाच्या गोपनीयतेचे उल्लंघन झाल्याने प्रशासनाने गुन्हा दाखल केला. राजस्थान रॉयल्स संघाचा कर्णधार रियान पराग यांनी गुवाहाटीतील मतदान केंद्रावर जाऊन मतदान केले. आसाममध्ये निवडणूक ड्युटीवर असलेल्या एका कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला. देबेन होरो (वय ४५) हे मतदान अधिकारी होते. त्यांच्या मृत्यूचे कारण स्पष्ट नाही. प्रसिद्ध गायक पापोन यांनी गुवाहाटीत मतदान केले. त्यांनी युवकांना मतदानासाठी बाहेर पडण्याचे आवाहन केले.

केरळमध्ये नेहमीप्रमाणे मतदान मोठ्या प्रमाणात झाले. मल्याळम अभिनेता कुंचाको बोबन यांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. मल्याळम अभिनेता ममूटी पत्नीसमवेत मतदानासाठी उपस्थित होता. त्यांनी पत्नी सुल्फाथ कुट्टी यांच्यासह कोची येथील मतदान केंद्रावर जाऊन मतदान केले. काँग्रेस खासदार शशी थरूर यांनी सांगितले की केरळ विधानसभा निवडणुकांमध्ये भाजपा हा महत्त्वाचा घटक नाही. ही लढत सत्ताधारी एलडीएफ आणि विरोधी युडीएफ यांच्यात आहे. राज्य विधानसभेत भाजपाचे अस्तित्व नाही आणि खरी लढत सध्याचे सरकार आणि युडीएफ यांच्यात आहे. शशी थरूर यांनी तिरुवनंतपुरम येथे मतदान केले. काँग्रेस नेत्या शमा मोहम्मद यांनी कन्नूर येथील सरकारी प्रशिक्षण केंद्रात उभारलेल्या मतदान केंद्रावर जाऊन मतदान केले. त्या म्हणाल्या, युडीएफ मोठ्या बहुमताने ही निवडणूक जिंकत आहे. लोकांना बदल हवा आहे. राज्यावर कर्ज आहे, बेरोजगारी आहे आणि सध्या अंमली पदार्थांची समस्या आहे. भाजपा इतकी हताश झाली आहे की ते मते खरेदी करत आहेत.काँग्रेसचे ज्येष्ठ नेते ए. के. अँटनी यांनी जीएचएस जगथी येथे मतदान केले. मतदान केंद्रावर त्यांच्यासोबत पक्षाचे नेते एम. एम. हसन उपस्थित होते. पुद्दुचेरीतील मन्नाडिपेट येथे मतदान केंद्रावर काँग्रेस आणि भाजप समर्थकांमध्ये झटापट झाली. पोलिसांनी जमावावर लाठीचार्ज केला. पुद्दुचेरीचे मुख्यमंत्री एन. रंगास्वामी मतदान करण्यासाठी मोटारसायकलवरून मतदान केंद्रावर पोहोचले. पुद्दुचेरीमध्ये मतदान केंद्रावर नीला रोबोटने मतदारांचे फुलांनी स्वागत केले.

# संतोष देशमुखांच्या पत्नीचा अर्ज दाखल! स्वरुपानंदही मैदानात

■ बीड

बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर रिक्त झालेल्या सरपंचपदासाठी आता पोटनिवडणूक होत आहे. आज संतोष देशमुख यांच्या पत्नी अश्विनी देशमुख यांनी अर्ज दाखल केला. त्यांच्या विरोधात यापूर्वी संतोष देशमुख यांच्याकडून पराभूत झालेले स्वरूपानंद देशमुख यांनीही उमेदवारी अर्ज भरल्याने ही निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता संपुष्टात आली आहे. बीड जिल्ह्यातील एकूण ८८ रिक्त जागांसाठी पोटनिवडणूक प्रक्रिया सुरू आहे.

यामध्ये १६ सरपंच आणि ७२ सदस्य अशा एकूण ८८ जागांचा समावेश आहे. मस्साजोग ग्रामपंचायतीच्या सरपंच पदासाठी ७ एप्रिल ते १३ एप्रिलदरम्यान उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहेत. संतोष देशमुख यांच्या निधनामुळे गावात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांचे अपूर्ण राहिलेले काम पूर्ण करण्यासाठी उर्वरित १८ महिन्यांचा कार्यकाळ त्यांच्या कुटुंबालाच मिळावा, अशी मागणी त्यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी केली.

# शाळा सोडल्याचा दाखला वयाचा निर्णायक पुरावा नाही

पान १ वरून

ॲड. अर्जुन कदम यांच्यामार्फत जामिनासाठी उच्च न्यायालयाचे दार ठोठावले होते. वसई तालुक्यातील वालीव पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला होता. आरोपीच्या जामीन अर्जावर सुनावणी करताना न्यायमूर्ती आर. एम. जोशी यांच्या एकलपीठाने सुनावणी घेतली. याचवेळी 'शाळा सोडल्याचा दाखला' हा पीडित मुलीच्या अल्पवयीन वयाचा निर्णायक पुरावा मानता येणार नाही, असे निरीक्षण नोंदवून न्यायालयाने आरोपी तरुणाला १५ हजार रुपयांच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर तुरुंगातून सोडून देण्याचे आदेश दिले. आरोपी आणि पीडित मुलगी यांच्यामध्ये प्रेमसंबंध असण्याची शक्यता नाकारता येत नाही, असेही न्यायालयाने निर्णय देताना नमूद केले.

# अमेरिकन इन्फ्लुएन्सरकडून भारतीय नावांची खिल्ली

पान १ वरून

तसेच, निवडणुकीत ज्यू, भारतीय आणि मुस्लीम उमेदवारांची संख्या जास्त असून, ख्रिश्चन उमेदवार कमी असल्याचा दावा करत त्याने धार्मिक बाबींवरही टिप्पणी केली. शहरातील मंदिरे आणि मशिदींविषयीही त्याने आक्षेपार्ह विधान केल्याचे व्हिडिओमध्ये दिसते. हा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर सोशल मीडियावर तीव्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत. अनेकांनी या वक्तव्याला वर्णद्वेषी आणि भडकावणारे म्हणत निषेध व्यक्त केला. भारतीय समुदाय अमेरिकेत शिक्षण, मेहनत आणि कायदेशीर मार्गाने आपली ओळख निर्माण करत असताना अशा प्रकारच्या टिप्पणी अयोग्य असल्याचे मतही व्यक्त होत आहे.



## मध्य रेल्वे

### जाहीर सूचना

मध्य रेल्वेच्या खाली नमूद केलेल्या विभागाच्या पूर्ण झालेल्या टप्प्यावर स्थित रेल्वे मार्ग आणि परिसरातील सर्व वापरकर्त्यांना याद्वारे सूचित करण्यात येते की, २५,००० व्होल्टची एसी ओव्हरहेड ट्रॅक्शन तार, संबंधित विभागासमोर नमूद केलेल्या तारखेला किंवा त्यानंतर विद्युतप्रवाहित केली जाईल. त्याच तारखेपासून ओव्हरहेड ट्रॅक्शन लाईन सर्वकाळ चालू मानली जाईल आणि कोणत्याही अनधिकृत व्यक्तीने सदर ओव्हरहेड लाईनजवळ जाऊ नये किंवा तिच्या परिसरात काम करू नये.

| विभाग | विद्युत प्रवाहाची तारीख |
|---|---|
| मध्य रेल्वेच्या मुंबई विभागात, जेएनपीटीच्या चौथ्या टर्मिनलशी संबंधित आणि जसई यार्ड व होल्डिंग यार्ड दरम्यानच्या ३ऱ्या मार्गिकेच्या संदर्भात, जसई यार्ड ते जेएनपीटी यार्ड (किमी ८६/०१ ते किमी ९३/२३) या पट्ट्यासाठी २५ केव्ही एसी कर्षण प्रणालीसह २५ केव्ही, सिंगल फेज, एसी ओव्हरहेड उपकरणांचे ऊर्जीकरण करणे. | ०८.०५.२०२६ |

AK-33

धोकादायक आणि स्फोटक वस्तूंसह प्रवास करणे हा शिक्षापात्र गुन्हा आहे.

## जाहीर नोटीस

मी, श्री राकेश बद्रीप्रसाद खैरालिया, श्री बद्रीप्रसाद बहुरी खैरालिया यांचा मुलगा व दिवंगत श्री बहुरी गुलजारी खैरालिया यांचा नातू, सदर परिपत्रकानुसार आपल्या वृत्तपत्राच्या माध्यमातून खालीलप्रमाणे जाहीर प्रसिद्धी करीत आहे:

माझे आजोबा दिवंगत श्री बहुरी गुलजारी खैरालिया हे सेंट जॉर्ज रुग्णालय, मुंबई येथे सफाईकामगार म्हणून कार्यरत होते. ते दिनांक ३१/१०/१९९५ रोजी सेवानिवृत्त झाले होते. त्यांचे दिनांक २२/०५/२०१५ रोजी निधन झाले आहे.

त्यांच्या पश्चात, माझ्या कुटुंबातील सध्याच्या परिस्थितीत कोणीही नोकरीत नसल्यामुळे, लाडपागे समितीच्या तरतुदीनुसार मी माझ्या आजोबांच्या जागी वारसा हक्काने सेंट जॉर्ज रुग्णालय, मुंबई येथे सफाईकामगार पदासाठी अर्ज (दावा) केला आहे.

सदर प्रक्रियेदरम्यान, सेंट जॉर्ज रुग्णालयातील प्रशासन कार्यालयातील सेवा नोंदवही (Service Book) मध्ये माझ्या आजोबांचे नाव काही ठिकाणी 'बहुरी गुलजारी खैरारीया' तर काही ठिकाणी 'बहुरी गुलजारी बाल्मिकी' असे वेगवेगळ्या आडनावाने नोंदविलेले आढळून आले आहे.

मी या प्रसिद्धी पत्रकाद्वारे जाहीर करतो की, माझे आजोबा अशिक्षित असल्यामुळे त्यांना वाचता-लिहिता येत नव्हते. त्यामुळे त्यांच्या सेवा नोंदवहीमध्ये आडनावाबाबत झालेल्या फरकाची त्यांना कोणतीही कल्पना नव्हती.

माझ्या आजोबांच्या निधनानंतर, मी लाडपागे समितीनुसार वारसा हक्काने नोकरीसाठी अर्ज केल्यावर, सेंट जॉर्ज रुग्णालयाच्या समितीने नावातील व आडनावातील फरकाबाबत स्पष्टीकरण मागितले आहे.

तरी, मी सदर प्रसिद्धी पत्रकाद्वारे सर्वांना जाहीर करतो की 'दिवंगत बहुरी गुलजारी खैरालिया', 'दिवंगत बहुरी गुलजारी खैरारिया' आणि 'बहुरी गुलजारी बाल्मिकी' ही सर्व नावे एकाच व्यक्तीची असून ते माझेच आजोबा आहेत.

तसेच, खैरारिया आणि खैरालिया ही आडनावे देखील एकाच व्यक्तीची असून त्याबाबतचे हमीपत्र (Affidavit) मी संबंधित प्राधिकरणाकडे सादर केलेले आहे.

तसेच, मी श्री राकेश बद्रीप्रसाद खैरालिया हा दिवंगत बहुरी गुलजारी खैरालिया यांचा नातू असून आम्ही एकाच कुटुंबातील आहोत, हे यानिमित्ताने जाहीर करीत आहे.

हे सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

**संपर्क क्रमांकः** ९७६९७ ७०९६६

दिनांकः १०/०४/२०२६, स्थळः मुंबई,

## सार्वजनिक सूचना

या सूचनेद्वारे, सोसायटी आणि माझ्या अशिलांच्या वतीने, सर्वसामान्य जनतेस असे कळविण्यात येते की, **'निओ शास्त्री नगर को-ऑप. हौ. सो. लि.'**, मुलुंड (पश्चिम), मुंबई - ४०००८२ येथील फ्लॅट क्रमांक १०/१२ (यापुढे 'सदर फ्लॅट' म्हणून संबोधला जाणारा) यांच्या मालकीण **श्रीमती जोगिंदर कौर अस्सी** यांचे दिनांक **१०/०५/२०१४** रोजी निधन झाले असून, त्यांनी आपल्या मागे १ मुलगी आणि २ मुले असे कायदेशीर वारस ठेवले आहेत. त्यांचे पती यांचेही दिनांक **१८/०६/२००८** रोजी निधन झाले होते. माझे अशिल म्हणजेच त्यांचे कायदेशीर वारस **श्री. जसबीर सिंग अस्सी, श्री. प्रितपाल सिंग अस्सी (दोघेही मुलगे)** आणि **श्रीमती हरदीप कौर जंडू (मुलगी)** यांनी सोसायटीकडे, सदर फ्लॅटमधील समभाग (शेअर्स) आणि भांडवल/ मालमत्तेमधील हक्क / हितसंबंध आपल्या नावावर हस्तांतरित करून घेण्यासाठी अर्ज केला आहे. सदर फ्लॅटच्या संदर्भात वारसा हक्क, हिस्सा, विक्री, गहाण, विश्वस्त, अदलाबदल, धारणाधिकार, मृत्युपत्र, बक्षीसपत्र, भार किंवा इतर कोणत्याही स्वरूपाचे बान यांद्वारे आक्षेप, दावे किंवा अधिकार सांगणाऱ्या व्यक्तींकडून / दावेदारांकडून सोसायटी आणि माझे अशिल आक्षेप आमंत्रित करत आहेत. आक्षेपदार/दावेदार यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून **१५ दिवसांच्या** आत, आपल्या दाव्याच्या पुष्ट्यर्थ आवश्यक कागदपत्रांसह सोसायटीशी किंवा खाली स्वाक्षरी करणाऱ्या व्यक्तीशी संपर्क साधावा; तसे करण्यात कसूर झाल्यास, त्यानंतर कोणत्याही दाव्याचा विचार केला जाणार नाही आणि माझे अशिल सदर फ्लॅटमधील समभाग व भांडवल / मालमत्तेमधील हक्क आपल्या नावावर हस्तांतरित करून घेण्यास पात्र ठरतील.

सही/-

**जे. एस. लाल (वकील)**

बी-४/१०४, सिल्व्हर पार्क, मीरा रोड (पू.) - ४०११०७.

ई-मेल - jslall@rediffmail.com

मोबाइल - ९८१९४६७४४७.

## अलाईड डिजिटल सर्व्हिसेस लिमिटेड

allied digital — IT managed. Responsibly.

**CIN:** L72200MH1995PLC085488

**नोंद. कार्यालयः** ८०८, ८ वा मजला, प्लॉट क्र. २२१/२२२, मफतलाल सेंटर, विधान भवन मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई - ४०००२१.

**दूर.:** ०२२ ६६८१ ६४००; **फॅक्स क्र.:** (०२२) २२८२ २०३०;

**वेबसाईटः** www.allieddigital.net, **ईमेलः** investors@allieddigital.net/ cs@allieddigital.net

### सूचना

**प्रदान न केलेले/दावा न केलेल्या लाभांशांचे गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधीला हस्तांतरण रोखण्याकरिता केवायसी आणि इतर संबंधित अद्यतने आणि भागधारकांच्या सहभागाकरिता दुसरे १००-दिवसाची मोहीम 'सक्षम निवेशक'**

अलाईड डिजिटल सर्व्हिसेस लिमिटेड ("कंपनी")च्या भागधारकांना याद्वारे सूचना देण्यात येते की, कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने (एमसीए)च्या दिनांक २७ मार्च, २०२६ रोजीच्या पत्रानुसार, कंपनीने दि. १ एप्रिल, २०२६ पासून सुरु होऊन दि. ०९ जुलै, २०२६ पर्यंत वर उल्लेखिल्यानुसार दुसरी १००-दिवसाची मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेदरम्यान सर्व भागधारक, ज्यांनी २०१९-२० ते २०२५-२६ पर्यंत कोणत्या ही वित्तीय वर्षाकरिता त्यांच्या लाभांशाची मागणी केलेली नाही किंवा ज्यांनी त्यांचे केवायसी किंवा दावा न केलेले लाभांश आणि समभागांशी संबंधित कोणत्याही बाबींचे अद्यतन केलेले नाही ते कंपनीचे निबंधक आणि हस्तांतरण एजन्ट (आरटीए) म्हणजेच एमयूएफजी इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वीची लिंक इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड), सी-१०१, एम्बसी २४७, एल.बी.एस. मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई-४०००८३, ईमेल - mumbai@in.mpms.mufg.com किंवा दूरध्वनीः +९१ ८१०८११६७६७, वेबसाईटः www.in.mpms.mufg.com यांना लिहावे. तसेच भागधारकांना कोणत्याही सहाय्याकरिता कंपनीस cs@allieddigital.net किंवा investors@allieddigital.net वर देखील संपर्क करता येईल. भागधारकांनी पुढे नोंद घ्यावी की, ही मोहीम विशेषकरून भागधारकांना त्यांचे केवायसी, बँक मॅन्डेट्स, नॉमिनी आणि संपर्क माहिती अद्ययावत करण्याकरिता त्यांच्यापर्यंत पोहोचण्यासाठी सुरु करण्यात आली आहे. भागधारक त्यांचे समभाग/लाभांश गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी प्राधिकरण (आयईपीएफए) कडे हस्तांतरित होण्यापासून रोखण्याकरिता उपरोल्लेखित वित्तीय वर्षाकरिता त्यांच्या लाभांशाची मागणी देखील करू शकतात.

**अलाईड डिजिटल सर्व्हिसेस लिमिटेड करिता**
**ख्याती शाह**
**कंपनी सचिव**
**सदस्यता क्र.: ए२८०७३**

**ठिकाणः मुंबई**
**दिनांकः ०९ एप्रिल, २०२६**

## कामगारांसाठी जाहीर सूचना / नोटीस

या जाहीराती द्वारे कळविण्यात येते की, **मे. ठाकूर एअरकंडीशनिंग कं.** प्लॉट नंबर सीटीएस २५४ (पार्ट), लेन नेक्स्ट टू USV Ltd., ऑफ बी. एस. देवशी मार्ग, गोवंडी (पूर्व), मुंबई- ४०००८८ या आराखड्याच्या जागेचे एकूण क्षेत्रफळ १७७१ चौ.मी. आहे. सदर जमीन मे. ठाकूर एअरकंडीशनिंग कं. यांचा औद्योगिक कारखाना होता. सदरहू कारखाना सन २००९ मध्ये मंदी असल्यामुळे बंद करण्यात आलेला आहे. तथापि, सदर जागेचा विकास / विक्री / हस्तांतरण करावयाचे आहे.

त्यामुळे या आराखड्यात पूर्वी काम केलेल्या सर्व कायम कामगार/कर्मचारी/तात्पुरते/कंत्राटी तसेच प्रशिक्षणार्थी व कामगारांची व त्यांच्या संघटनांची कामगारांच्या कायदेशीर देणी बाबत, विवादासंदर्भात दावे / तक्रारी असल्यास संबंधितांनी लेखी तक्रार कागदपत्रांच्या पुराव्यासहित मा. कामगार उप आयुक्त, मुंबई उपनगर (पूर्व), कामगार आयुक्त यांचे कार्यालय कामगार भवन तिसरा मजला, सी-२०, ई-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०००५१.

यांच्याकडे अथवा मे. ठाकूर एअरकंडीशनिंग कं. प्लॉट नंबर सीटीएस २५४ (पार्ट), लेन नेक्स्ट टू USV Ltd., ऑफ बी. एस. देवशी मार्ग, गोवंडी (पूर्व), मुंबई- ४०००८८ यांच्याकडे जाहीर नोटीस / सूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत सादर करावी. या कालावधीनंतर दाखल केलेली तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही व अशा दाव्यांची दखल न घेता ते अशा व्यक्ती / कामगार व कामगारांचे वारसदार यांनी आपले हक्क सोडले आहेत व ते आमच्यावर बंधनकारक नाहीत असे समजून आम्ही पुढील कारवाई करू याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**मे. ठाकूर एअरकंडीशनिंग कं.**

सही /-
**मे. ठाकूर एअरकंडीशनिंग कं.**
तर्फे

**स्थळ : मुंबई उपनगर (पूर्व)**
**दिनांक : १०.०४.२०२६**

## सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, **दिवंगत श्री. मोहन पोकरदास मथरानी**, जे चेंबूर नवजीवन को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.चे सदस्य, प्लॉट क्र. ३४, रामक्रिष्णा चेंबुरकर मार्ग, चेंबूर, मुंबई ४०००७४ येथे स्थित इमारत **क्र. ७-ए** मधील २ ऱ्या मजल्यावरील **सदनिका क्र. ५** चे धारक होते; त्यांचे मुंबई येथे **दि. २८ ऑगस्ट, २०२०** रोजी निधन झाले.

माझ्या अशील **सौ. नीलम मोहन मथरानी**, राहणार प्लॉट क्र. ३४, रामक्रिष्णा चेंबुरकर मार्ग, चेंबूर, मुंबई ४०००७४ येथे स्थित इमारत क्र. ७-ए मधील २ ऱ्या मजल्यावरील सदनिका क्र. ५; दिवंगत व्यक्तीच्या पत्नी यांच्या वतीने, मी याद्वारे सदर सूचना प्रसिद्धीपासून १४ दिवसांच्या आत सदर सदनिका आणि संबंधित भाग प्रमाणपत्र **क्र. १०१ दिनांक २१ डिसेंबर, २०१६** अंतर्गत डिस्टिंक्टिव्ह क्र. **१००१ ते १०१०** (दोन्ही समाविष्ट) धारण केलेल्या रु. ५०/- (रुपये पन्नास मात्र) चे **(१०) दहा** पूर्णतः भरणा केलेले समभाग, एकमेव नॉमिनी/कायदेशीर वारस म्हणून तिच्या नावे हस्तांतरित करण्यासंबंधी दावे किंवा आक्षेप आमंत्रित करीत आहे.

कोणा व्यक्तीचा सदर सदनिका आणि समभागांच्या संदर्भात विक्री, वारसा, गहाणवट, भेट या मार्गे किंवा अन्यथा कोणताही दावा, हक्क, शीर्षक, हितसंबंध, आक्षेप किंवा मागणी असल्यास त्यांनी त्यांचा दावा निम्नस्वाक्षरीकार यांना खाली उल्लेखिलेल्या पत्त्यावर, सहाय्यक दस्तऐवजांसह, निर्धारित वेळेमध्ये लेखी सादर करावा.

जर १४ दिवसांमध्ये कोणतेही दावे किंवा आक्षेप प्राप्त न झाल्यास, संस्था दिवंगत सदस्याचे संस्थेच्या भांडवल/मालमत्तेमधील समभाग आणि हितसंबंध संस्थेच्या उप-विधी आणि महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा, १९६० नुसार माझ्या अशील, **सौ. नीलम मोहन मथरानी** यांच्या नावे हस्तांतरित करण्यास मुक्त असेल.

**मालमत्तेचे वर्णनः**

भाग प्रमाणपत्र क्र. १०१ असलेल्या; प्लॉट क्र. ३४, रामक्रिष्णा चेंबुरकर मार्ग, चेंबूर, मुंबई ४०००७४ येथे स्थित इमारत क्र. ७-ए मधील २ ऱ्या मजल्यावरील निवासी सदनिका क्र. ५ चे सर्व खंड आणि तुकडे.

**ॲड. अजीत सिंग हिंदुजा**
ॲडव्होकेट उच्च न्यायालय
**पत्ताः** कार्यालय क्र. ३०७,
महिंद्रा चेंबर्स प्रिमायसेस सोसायटी लि.,
डब्ल्यू. टी. पाटील मार्ग, पांजरापोळ
सर्कलजवळ,चेंबुर, मुंबई ४०००७१.
मोबाईल क्र. ९८२१४८०२४४ आणि ९१३७५०८६२५
**ईमेल आयडीः** Hinduja.associates@rediffmail.com आणि Hinduja.company2010@gmail.com
**दिनांकः** १० एप्रिल, २०२६
**ठिकाणः** मुंबई

## फॉर्म ए
## जाहीर घोषणा

*(इन्सॉल्व्हन्सी अँण्ड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (ऐच्छिक परिसमापन प्रक्रिया) विनियम, २०१७ चे नियम १४ अन्वये)*

### एस्टायर रिसर्च अँण्ड ॲनालिटिक्स प्रायव्हेट लिमिटेडच्या भागधारकांचे लक्ष वेधण्याकरिता

| | | |
|---|---|---|
| १ | कॉर्पोरेट व्यक्तीचे नाव | **एस्टायर रिसर्च अँण्ड ॲनालिटिक्स प्रायव्हेट लिमिटेड** |
| २ | कॉर्पोरेट व्यक्तीची स्थापना तारीख | ०४.१०.२०११ |
| ३ | ज्या प्राधिकरणाअंतर्गत कॉर्पोरेट व्यक्ती स्थापना/नोंदणीकरण झाले आहे | कंपनी निबंधक, मुंबई |
| ४ | कॉर्पोरेट व्यक्तीचे कॉर्पोरेट ओळख क्र./ मर्यादित दायित्व ओळख क्र. | U74120MH2011PTC222701 |
| ५ | कॉर्पोरेट व्यक्तीचे नोंदणीकृत कार्यालय व प्रधान कार्यालयाचा (काही असल्यास) पत्ता | कार्यालय क्र. ३०८, हिल्टन सेंटर, प्लॉट क्र. ६६, सेक्टर ११, पाम बीच रोड, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई, ठाणे - ४००६१४ महाराष्ट्र |
| ६. | कॉर्पोरेट व्यक्तीची परिसमापन सुरू होण्याची तारीख | ०७.०४.२०२६ |
| ७. | परिसमापकाचे नाव, पत्ता, ईमेल पत्ता, दूरध्वनी क्रमांक, नोंदणी क्र. | **श्री. पंकज कुमार गुप्ता**<br>नोंदणी क्र. - IBBI/IPA-002/IP-NO1213/2021-2022/14066<br>**संपर्क पत्ता:** ७०डी, पॉकेट-ए, उड्डाणपूल खांब क्र.११ समोर, आऊटर रिंग रोड, विकास पुरी विस्तार, टिळक नगर ११००१८.<br>**नोंदणीकृत पत्ता:** फ्लॅट # ८०४, इमारत क्र. ८, सेक्टर - २ रौनक सिटी, कल्याण पश्चिम, महाराष्ट्र - ४२१३०१<br>ईमेल आयडी: ippankajgupta2011@gmail.com, दूरध्वनी: ९७१६७७७७५७ |
| ८. | दावा सादर करण्याची अंतिम तारीख | ०७.०५.२०२६ |

येथे सूचना देण्यात येत आहे की **एस्टायर रिसर्च अँण्ड ॲनालिटिक्स प्रायव्हेट लिमिटेडने ०७.०४.२०२६** रोजी ऐच्छिक परिसमापन सुरू केले आहे.

**एस्टायर रिसर्च अँण्ड ॲनालिटिक्स प्रायव्हेट लिमिटेड**च्या भागधारकांना **०७.०५.२०२६** रोजी किंवा त्यापूर्वी बाब ७ विरुद्ध नमूद केलेल्या पत्त्यावर परिसमापकाकडे त्यांच्या दाव्यांचा पुरावा सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

वित्तीय धनकोंनी त्यांच्या दाव्यांचा पुरावा फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावा. इतर सर्व भागधारक दाव्यांचा पुरावा वैयक्तिकरित्या, पोस्टाने किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमाने सादर करू शकतात.

दाव्याचे खोटे किंवा दिशाभूल करणारे पुरावे सादर केल्यास दंड आकारला जाईल.

परिसमापकाचे नाव आणि स्वाक्षरी:
**सही/-**
**पंकजकुमार गुप्ता**
**एस्टायर रिसर्च अँण्ड ॲनालिटिक्स प्रायव्हेट लिमिटेडच्या बाबतीत परिसमापक**
नोंद क्र.- IBBI/IPA-002/IP-N01213/2021-2022/14066
एएफए: एए२/१४०६६/०२/३००६२६/२०३८८९ वैधता ३०-जून-२६ पर्यंत
दिनांक: १०.०४.२०२६
ठिकाण: मुंबई

## ई - निविदा सूचना

महावितरण

कार्यकारी अभियंता, कल्याण पश्चिम विभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, तळमजला, तेजश्री, कर्णिक रोड, कल्याण (प) ४२१ ३०१ यांनी मान्यताप्राप्त ठेकेदार / एजन्सीकडून अटी व शर्तीसह संबंधित कागदपत्रांसह खाली नमुद केलेल्या कामासाठी ई - निविदा मागविण्यात येत आहे.

| क्र | निविदा क्र. इइ/कल्याण /तां/ | कामाचा तपशील | निविदा रक्कम | इसारा रक्कम | निविदा शुल्क १८% जीएसटीसह |
|---|---|---|---|---|---|
| १ | नि-०१/ २०२६-२७ | नादुरुस्त व दुरूस्त झालेले विद्युत रोहित्र, ऑईल ड्रमचे ने / आण व लोडींग / अनलोडींगचे काम कल्याण पश्चिम विभागांतर्गत करणे तसेच मुख्य भांडार नेतिवली अंतर्गत कंपनीच्या सामुग्रीची ने / आण व लोडींग / अनलोडींगचे काम करणे. | रू. १५.०० लाख | रू. १५,०००/- | रू. १,१८०/- |

ई - निविदा अर्ज महावितरणाच्या वेबसाईटवरून घेण्याचा कालावधी - दि. ०९.०४.२०२६ ते दि. २०.०४.२०२६

ई - निविदा अर्ज महावितरणाच्या वेबसाईटवर भरण्याचा कालावधी - दि. ०९.०४.२०२६ ते दि. २०.०४.२०२६ दु. १६.०० वाजेपर्यत

निविदा पुर्व बैठक - दि. १३.०४.२०२६ स. ११.०० वाजता

ई - निविदा उघडण्याची वेळ तांत्रिक बोली - दि. २०.०४.२०२६ दु. १६.०५ वाजता

जर वरिल दिवशी सुट्टी आल्यास वा काही अपरिहार्य कारण असल्यास ई - निविदा लगेचच दुसऱ्या दिवशी उघडण्यात येईल. निविदा प्रत (Hard Copy) कार्यालयातुन देण्यात येणार नाही.

वरिलपैकी एक वा सर्व निविदा रद्द करणे याचा निर्णय घेण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकारास राहिल.

अधिक तपशीलासाठी खालील वेबसाईटला भेट द्या. https://etender.mahadiscom.in/eatApp/

काही सुचना / शंका असल्यास भ्रमणध्वनी क्र. ८८७९६२६३०१ वर वा ई मेल eeklnu@gmail.com वर संपर्क करा.

**कार्यकारी अभियंता, कल्याण पश्चिम विभाग**

## e-TENDER NOTICE

MAHAVITARAN — Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

e-Tenders are invited from the Power Transformer repairers registered with MSEDCL for Annual Rate Contract for Repairs of failed Power Transformers in Konkan Zone.

| Tender No. | Particulars | Estimated Cost in Rs. | E.M.D. (Rs.) |
|---|---|---|---|
| CE/KZR/ PTF REPAIR/ T-01/2026-27 | Annual Contract for repairs of 33/11 KV failed Power Transformers of capacity of 5 MVA & 10 MVA in Ratnagiri Circle and Sindhudurg Circle under Konkan Zone. | Rs. 100.00 Lakhs | Rs. 1.00 Lakhs |

For details please visit our website **https://etender.mahadiscom.in/eatApp**

**Contact person:** Executive Engineer (Admn.), Mobile: 7875765001, MSEDCL, Konkan Zone, New Administrative Bldg.', 1st floor, Nachane Road, Ratnagiri, Dist- Ratnagiri. email: **cekzrtech@gmail.com**

**Sd/-**
**Chief Engineer (KZR)**

**(No. PRO-KZR-04/2026-27)**

## महाराष्ट्र शासन
## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग, जि. रायगड.

माहितीचा अधिकार

**जिल्हा सामान्य रुग्णालय परिसर, बीच रोड, अलिबाग.जि.रायगड**

Email- deangmcalibag@gmail.com    Phone No. 02141-299214    www.gmchalibag.in/gmch

### जाहिरात

**विषयः-** **सहाय्यक प्राध्यापक या संवर्गाची पदे ३६४ (कंत्राटी) दिवसांकरीता निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात संस्थास्तरावर निवड समितीमार्फत भरणेबाबत.**

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग-रायगड येथील विविध विषयातील सहाय्यक प्राध्यापक ''गट-ब'' या पदावर ३६४ (करार तत्त्वावर) दिवसांकरीता तात्पुरती नियुक्ती जाहिरात देण्यात येत आहे. सदर जाहिरात संस्थेच्या संकेतस्थळावर (www.gmchalibag.in/gmch) तसेच मा. संचालनालयाच्या (www.med-edu.in) या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. रिक्त पदे, अर्जाचा विहित नमुना व अटी शर्ती इ. अधिक तपशील पाहण्याकरिता वरील दिलेल्या संकेतस्थळावर भेट देण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| १) | उमेदवारांनी अर्ज सादर करावयाचा कालावधी | दि. १०/०४/२०२६ ते दि. २०/०४/२०२६ सकाळी ११.०० ते सायं. ०५.०० वाजेपर्यंत. (सुटीचे दिवस वगळुन) |
| २) | मुलाखतीचा दिनांक | दि. २२/०४/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता |
| ३) | मुलाखतीचे ठिकाण | अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग-रायगड (परिषद हॉल) |

**सही/-**
**(डॉ. पूर्वा पाटील)**
**अधिष्ठाता**
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय
अलिबाग - रायगड.

क्रमांक : आरओसी-२०२६-२७/क्र-५/सी १४७

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
### (महाराष्ट्र शासन अंगिकृत)
### ई निविदा सूचना क्रमांक ०२/२०२६-२०२७ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | तळोजा पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती..... तळोजा औद्योगिक क्षेत्र व तळोजा फीडर रस्त्यामधील रस्त्यालगतचे, मोकळे भूखंड / जागा, राखीव भूखंड आणि सुविधा भूखंडांवरील अतिक्रमण हटवणे. | ₹ १९,११,०१०.०० |
| २ | निवळी पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.... निवळी जलशुद्धीकरण केंद्रातील सीएलएफ पुलाची दुरुस्ती व बळकटीकरण करणे, फ्लॅश मिक्सर बदलणे व अनुषंगिक कामे करणे. | ₹ ३९,५७,५००.०० |
| ३ | डोंबिवली औद्योगिक क्षेत्र व कल्याण भिवंडी औद्योगिक क्षेत्रामधील रस्त्यांची देखभाल व दुरुस्ती... डोंबिवली व कल्याण भिवंडी औद्योगिक क्षेत्रामधील अतिक्रमण/ अनधिकृत बांधकाम हटवणे. | ₹ ३९,१९,४३६.०० |
| ४ | तळोजा येथील सांडपाणी निःसारण योजनेच्या टप्पा क्र.१ ची देखभाल व दुरुस्ती... तळोजा येथील सांडपाणी निःसारण योजनेच्या टप्पा क्र. १ मधील उदंचन गृहातील ३ मेट्रिक टन क्षमतेची ईओटी क्रेन बदलणे व अनुषंगिक कामे करणे. | ₹ ३८,७०,४५८.०० |
| ५ | रानसई पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्ती... रानसई धरणावरील अशुद्ध जलवाहिनीवर इनलाइन एअरेशन सिस्टीमचा पुरवठा करणे, बसविणे व चाचणी घेऊन कार्यान्वित करणे. | ₹ ३९,९५,०८९.०० |
| ६ | पाताळगंगा येथील नवीन पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... पाताळगंगा येथील नवीन पाणीपुरवठा योजनेच्या फिल्टर बेड क्र. ४ ची दुरुस्ती व बळकटीकरण करणे. | ₹ ३९,७४,२७०.०० |
| ७ | टीटीसी औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरुस्ती........ रबाळे सांडपाणी उदंचन गृहातील ४० अश्वशक्ती क्षमतेच्या पंपसेटची दुरुस्ती करणे. | ₹ ३९,३५,९६०.०० |
| ८ | शहाड वॉटर वर्क्सची देखभाल व दुरुस्ती... शहाड येथील जलशुद्धीकरण केंद्रातील लाइटिंग लोड सेपरेशनसाठी एलटी पॅनेल व केबल्सचा पुरवठा करून, उभारणे व कार्यान्वित करणे तसेच इतर किरकोळ कामे करणे. | ₹ ३९,५५,४९८.०० |
| ९ | तळोजा व टीटीसी औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरुस्ती..... तळोजा टप्पा १ व २, ऐरोली सांडपाणी उदंचन केंद्रातील विविध ठिकाणी बसविलेल्या पंपांची वार्षिक तत्वावर देखभाल व दुरुस्ती करणे. **(दुसरी मागणी)** | ₹ २७,४७,१५९.०० |
| १० | मरोळ येथील मुख्यालयीन इमारतीची देखभाल व दुरूस्ती ...... मरोळ औद्योगिक क्षेत्रातील उद्योग सारथी इमारतीमधील मा. मु.का.अ. कार्यालयाच्या ९ व्या स्तरावरील बोर्ड रूममधील ऑडिओ आणि व्हिडिओ उपकरणांची वार्षिक तत्वावर सर्वसमावेशक २ वर्षांसाठी देखभाल व दुरूस्ती करणे. **(दुसरी मागणी)** | ₹ १७,७२,१००.०० |

उपरोक्त अ.क्र. १ ते ८ वरील कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक १०/०४/२०२६ ते दिनांक २४/०४/२०२६ पर्यंत व अ.क्र. ९ व १० वरील कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक १०/०४/२०२६ ते दिनांक २०/०४/२०२६ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक १३/०४/२०२६ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक १५/०४/२०२६ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

# तमन्नाची द्विदशकपूर्ती...

**भारतीय** चित्रपटसृष्टीत दोन दशकांहून अधिक काळ आपल्या अभिनयाची जादू पसरवणारी अभिनेत्री तमन्ना भाटिया सध्या वेगळ्याच उत्साहात आहे. चित्रपटसृष्टीतील २१ वर्षांच्या प्रदीर्घ प्रवासानंतरही आपल्याला मिळणाऱ्या संधी आणि प्रेक्षकांचे प्रेम पाहून तमन्ना भारावून गेली आहे. विशेषत: महिला अभिनेत्रींच्या बाबतीत इतका प्रदीर्घ काळ टिकून राहणे आणि आजही नवनवीन आव्हानात्मक भूमिका मिळणे ही एक दुर्मीळ गोष्ट असल्याचे मत तिने व्यक्त केले आहे. दिल्लीतील एका कार्यक्रमादरम्यान माध्यमांशी बोलताना तमन्ना म्हणाली की, माझ्या कारकिर्दीला २१ वर्षे पूर्ण झाली आहेत, तरीही मला आजही असे वाटतेय की मी आता कुठे सुरुवात करत आहे. खूप कमी अभिनेत्रींना त्यांच्या कारकिर्दीच्या या टप्प्यावर अशा प्रकारच्या संधी मिळतात. माझ्या आगामी चित्रपटांबाबत मी अत्यंत उत्सुक आहे आणि प्रत्येक चित्रपट एका नव्या उत्साहाने मी स्वीकारत आहे. दक्षिण भारतीय चित्रपटसृष्टीतून आपल्या प्रवासाची सुरुवात करणाऱ्या तमन्नाला आता संपूर्ण भारतातून मिळणारे प्रेम आणि स्वीकारार्हता अधिक सुखावणारी वाटत आहे. आपल्या कारकिर्दीच्या या 'रिव्हायव्हल' मोडमध्ये तमन्ना अधिक प्रगल्भ आणि उत्साही दिसून येत आहे.



# अनन्याचा 'पॉझिटिव्ह' पुढाकार



**परीक्षेचा** काळ जवळ आला की अनेक घरांमध्ये तणावाचे वातावरण निर्माण होते. मुलांवर असलेल्या अपेक्षांचे ओझे आणि निकालाची भीती यामुळे कौटुंबिक शांतता अनेकदा भंग पावते. हीच बाब लक्षात घेऊन 'निक इंडिया' आणि अभिनेत्री अनन्या पांडे हिच्या 'सो पॉझिटिव्ह' या उपक्रमाने एकत्र येत 'प्रेशर को बोलो बाय' ही विशेष मोहीम सुरू केली आहे. त्यांच्यातील उपजत कलागुणांना आणि शिकण्याच्या पद्धतीला पालकांनी महत्त्व दिले पाहिजे.

या मोहिमेबद्दल बोलताना अनन्या पांडे म्हणाली की, परीक्षेचा ताण हा प्रत्येक विद्यार्थ्याच्या आयुष्यातील एक भाग असतो, परंतु त्या ताणाने तुमची ओळख ठरत नाही. मोठे होत असताना मला जाणवले की, अशा वेळी थोडा वेळ थांबून, दीर्घ श्वास घेऊन स्वत: ला हे

मुलांमधील परीक्षेचा ताण कमी करणे आणि त्यांना खेळकर पद्धतीने या परिस्थितीचा सामना करण्यास मदत करणे, हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे.

या उपक्रमांतर्गत अनन्या पांडेने निकच्या 'चिकू आणि बंटी' या लोकप्रिय पात्रांसोबत मिळून एका विशेष कार्यक्रमात सहभाग घेतला. यावेळी मुलांनी फुग्यांवर आपल्या मनात असलेल्या परीक्षेच्या भीतीबद्दल लिहिले आणि ते फुगे फोडून आपला ताण दूर करण्याचे प्रतीक म्हणून आनंद साजरा केला. या साध्या पण प्रभावी कृतीतून मुलांमधील अदृश्य दबाव कमी करण्याचा प्रयत्न करण्यात आला. अनन्याने या मोहिमेद्वारे हे पटवून दिले की, मुलांची एकमेकांशी तुलना करण्यापेक्षा सांगणे महत्त्वाचे आहे की, परीक्षा हा जीवनाच्या मोठ्या प्रवासातील एक छोटासा टप्पा आहे. निक इंडियाच्या या उपक्रमामुळे मुले आणि पालकांना परीक्षेच्या तणावाबद्दल मोकळेपणाने बोलण्याची आणि सकारात्मक मार्गाने तो हाताळण्याची संधी मिळत आहे, याचे मला समाधान वाटते.


# सान्या-ऋषभचे नाते संपुष्टात?

बॉलिवूड अभिनेत्री सान्या मल्होत्रा आणि प्रसिद्ध सतारवादक ऋषभ रिखीराम शर्मा यांच्या नात्याबाबत गेल्या काही दिवसांपासून चित्रपटसृष्टीत सुरू असलेल्या चर्चांना आता पूर्णविराम मिळाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या वर्षभरापासून एकमेकांना डेट करत असलेल्या या जोडीने आता शांतपणे वेगळे होण्याचा निर्णय घेतला आहे. अत्यंत खाजगी ठेवलेले हे नाते संपुष्टात आल्याचे वृत्त समोर आले असून, दोघांनीही सोशल मीडियावर एकमेकांना अनफॉलो केले आहे. सान्या आणि ऋषभ यांचे नाते २०२५ च्या सुरुवातीला चर्चेत आले होते. जानेवारी २०२५ मध्ये एका रेडिट वापरकर्त्याने या दोघांचे काही फोटो शेअर केले होते, ज्यामध्ये ते एकत्र वेळ घालवताना दिसत होते. जरी त्यांनी कधीही आपल्या नात्याची अधिकृत कबुली दिली नव्हती किंवा ते सार्वजनिक कार्यक्रमात कधीही एकत्र दिसले नव्हते, तरीही अनेकदा पापाराझींनी त्यांना एकाच ठिकाणाहून वेगवेगळ्या वेळी बाहेर पडताना टिपले होते.



# हिमेश रेशमिया आणि सूरज बडजात्या पुन्हा एकत्र

'प्रेम रतन धन पायो' या सुपरहिट चित्रपटाच्या यशानंतर दिग्दर्शक सूरज बडजात्या आणि ख्यातनाम संगीतकार हिमेश रेशमिया ही जोडी पुन्हा एकदा एकत्र आली आहे. या आगामी कौटुंबिक मनोरंजक चित्रपटात आयुष्मान खुराना आणि शर्वरी वाघ मुख्य भूमिकेत दिसणार असून, हिमेशने या चित्रपटासाठी सात अत्यंत मधुर गाणी तयार केली आहेत. या चित्रपटाचे सध्याचे नाव 'ये प्रेम मोल लिया' असे असून, त्यात बदल होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. अद्याप अंतिम नावावर शिक्कामोर्तब झाले नसून, लवकरच निर्मात्यांकडून याची अधिकृत घोषणा केली जाईल. सूरज बडजात्या यांच्या प्रत्येक चित्रपटात संगीताला अनन्यसाधारण महत्त्व असते. त्यांना या चित्रपटासाठी अशी गाणी हवी होती जी साधी, मनाला भिडणारी आणि सर्वसामान्यांना आवडतील अशी असावीत. केवळ शहरी प्रेक्षकच नव्हे तर ग्रामीण भागातील श्रोत्यांच्या ओठांवरही ही गाणी रुळावीत, असा सूरज यांचा आग्रह होता. हिमेश रेशमिया हा अशा प्रकारच्या 'मास अपील' असलेल्या संगीताचा मास्टर मानला जातो, त्यामुळेच त्याची निवड करण्यात आली. विशेष म्हणजे, आयुष्मान खुरानाच्या एखाद्या चित्रपटासाठी हिमेश रेशमियाने संगीत देण्याची ही पहिलीच वेळ आहे.



# गोपनीयतेसाठी भन्साळींचे फर्मान

संजय लीला भन्साळी यांच्या 'लव्ह अँड वॉर' या भव्य प्रकल्पाची सध्या चित्रपटसृष्टीत जोरदार चर्चा आहे. या चित्रपटात रणबीर कपूर, आलिया भट्ट आणि विकी कौशल असे तगडे कलाकार मुख्य भूमिकेत आहेत. भन्साळींचा हा चित्रपट त्यांच्या नेहमीच्या शैलीप्रमाणेच भव्य आणि दृश्यमानतेच्या दृष्टीने समृद्ध असणार आहे, मात्र यावेळी त्यांनी चित्रपटाची गोपनीयता जपण्यासाठी अत्यंत कडक पावले उचलली आहेत. चित्रपटाच्या सेटवरून कोणतीही माहिती किंवा कलाकारांचे लूक लीक होऊ नयेत, यासाठी भन्साळींनी केवळ गोपनीयता करार (एनडीए) करून न थांबता, सेटवर मोबाईल आणण्यास पूर्णपणे बंदी घातली आहे. प्रत्येक कर्मचाऱ्याला आणि क्रू मेंबरला सेटवर प्रवेश करण्यापूर्वी आपले मोबाईल फोन जमा करावे लागत आहेत. या निर्णयामुळे प्रेक्षकांमध्ये चित्रपटाच्या सेटबाबतची आणि कथानकाबाबतची उत्सुकता अधिकच ताणली गेली आहे. हा चित्रपट अनेक अर्थांनी खास आहे. रणबीर कपूरने २००७ मध्ये भन्साळींच्या 'सावरिया' चित्रपटातून पदार्पण केले होते, त्यानंतर तब्बल १९ वर्षांनी हे दोघे पुन्हा एकत्र काम करत आहेत. तसेच, 'ब्रह्मास्त्र'नंतर रणबीर आणि आलिया ही जोडी पुन्हा एकदा पडद्यावर एकत्र दिसणार आहे. तर विकी कौशल पहिल्यांदाच संजय लीला भन्साळींसोबत काम करत आहे.



# आडनावामुळेच मिळाला पहिला चित्रपट



दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील अष्टपैलू अभिनेता पृथ्वीराज सुकुमारन याने चित्रपटसृष्टीतील घराणेशाही आणि स्वत:च्या प्रवासाबाबत अत्यंत स्पष्ट आणि प्रांजळ मत व्यक्त केले आहे. मल्याळम चित्रपटसृष्टीतील दिग्गज अभिनेते सुकुमारन यांचा मुलगा असलेल्या पृथ्वीराजने मान्य केले की, त्याला मिळालेला पहिला चित्रपट हा केवळ त्याच्या आडनावामुळेच मिळाला होता. एका मुलाखतीत बोलताना पृथ्वीराज म्हणाला की, मी खूप नशीबवान होतो. मला माझ्या पहिल्या चित्रपटासाठी साधी ऑडिशनही द्यावी लागली नव्हती, कारण माझे आडनाव सुकुमारन होते. दिग्दर्शकाने केवळ माझ्या कौटुंबिक पार्श्वभूमीमुळे माझी निवड केली होती. मात्र, तुमचे आडनाव तुम्हाला केवळ पहिला चित्रपट मिळवून देऊ शकते, त्यानंतरचा प्रवास पूर्णपणे तुमच्या कर्तृत्वावर अवलंबून असतो. शुक्रवारी जेव्हा चित्रपट प्रदर्शित होतो, तेव्हा प्रेक्षक नावाचा विचार न करता केवळ तुमच्या कामाचा न्याय करतात. यावेळी त्याने आपला आगामी चित्रपट 'सरजमीन'मधील सहकलाकार आणि सैफ अली खानचा मुलगा इब्राहिम अली खान याचे उदाहरण दिले. पृथ्वीराजच्या मते, सुरुवातीला इब्राहिमकडे सैफचा मुलगा म्हणून पाहिले जाईल, पण दीर्घकाळ टिकण्यासाठी त्याला स्वत:चे कौशल्यच सिद्ध करावे लागेल.

# बुलेट ट्रेन प्रकल्पात फसवणूक जमीनबाधित म्हणून लुटले

■ वसई

**बुलेट** ट्रेन प्रकल्पात आपली मालमत्ता बाधित झाल्याचे सांगून तब्बल साडेतीन कोटी रुपये लाटल्याचे प्रकरण समोर आले. या प्रकरणी व्यावसायिकासह सार्वजनिक बांधकाम खाते आणि महसूल खात्याच्या अधिकाऱ्यांवर नायगाव पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला.

मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन वसई-विरार मधील २१ गावांतून जाणार आहे. या प्रकल्पात बाधित होणाऱ्या शेतकरी आणि जमीन मालकांना सरकारतर्फे मोबदला देण्यात आला होता. मात्र याचा फायदा एका व्यावसायिकाने घेतला. त्याचे गोदाम आहे. त्या मार्गावरून बुलेट ट्रेन जाणार होती. त्यामुळे २०१९ सालची खोटी कागदपत्रे तयार करून त्याने आपली मालमत्ता बुलेट ट्रेनच्या मार्गिकेत असल्याचे दाखवले असा आरोप आहे. एवढेच नव्हे तर त्याने मूळ दोन मजली असलेले गोदाम ३ मजल्यांची दाखवली. त्यामुळे त्याला सरकारकडून ३ कोटी ५६ लाख रुपये मोबदला मिळाला. मात्र त्याचा भागीदाराशी आर्थिक वाद झाला आणि हा घोटाळा उघडकीस आला.

# पुण्यात जिल्हा परिषद शाळा दहावीपर्यंत टप्प्याटप्प्याने वर्गवाढीला शासनाची मंजुरी

■ पुणे

**पुणे** जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये इयत्ता दहावीपर्यंतचे वर्ग सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. शासनाच्या धोरणानुसार आवश्यक विद्यार्थीसंख्या पूर्ण करणाऱ्या शाळांना टप्प्याटप्प्याने दहावीपर्यंत वर्गवाढीस मान्यता दिली जाणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी दिली.



पुणे जिल्हा परिषदेच्या ३,५०० हून अधिक प्राथमिक शाळा आहेत. त्यामध्ये सुमारे २.३ लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या शाळांमध्ये ११,२२८ शिक्षक कार्यरत आहेत. सध्या बहुतेक शाळा चौथी किंवा सातवीपर्यंतच मर्यादित असल्याने पुढील शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना इतर शाळांकडे वळावे लागते. त्यामुळे वर्गवाढीचा हा निर्णय विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाचा ठरणार आहे.

याबाबत गजानन पाटील यांनी सांगितले की, शाळांच्या वर्गवाढीची मंजुरी देण्याचे अधिकार जिल्हा परिषदेला देण्यात आले. निकषानुसार वरच्या वर्गासाठी किमान २५ विद्यार्थ्यांची आवश्यकता आहे. उदाहरणार्थ, एखादी शाळा आठवीपर्यंत असल्यास नववीचा वर्ग सुरू करण्यासाठी किमान २५ विद्यार्थी असणे बंधनकारक आहे. हा निकष पूर्ण करणाऱ्या शाळांमध्ये टप्प्याटप्प्याने दहावीपर्यंतचे वर्ग सुरू केले जाणार आहेत.

# राहुल बॅनर्जी मृत्यूच्या विधानावरून गांगुली-अभिनेत्री स्वस्तिका आमनेसामने

■ कोलकाता

**बंगाली** अभिनेता राहुल अरुणोदय बॅनर्जी यांच्या मृत्यू प्रकरणात माजी क्रिकेटपटू सौरव गांगुली यांचे एक वक्तव्य वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. राहुल यांचा ओडिशामध्ये 'भोलेबाबा पार करेगा' या बंगाली शोच्या शूटिंगदरम्यान पाण्यात बुडून मृत्यू झाला होता. या घटनेवर प्रतिक्रिया देताना सौरव यांनी ते पाण्यात गेलेच का? असा प्रश्न उपस्थित केला होता,

त्यावर बंगाली अभिनेत्री स्वस्तिका मुखर्जी यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

माध्यमांशी बोलताना सौरव गांगुली यांना राहुलच्या मृत्यूबाबत विचारण्यात आले, तेव्हा त्यांनी याला 'अत्यंत दुर्दैवी' म्हटले. पण मला समजत नाही की शूटिंगसाठी ते पाण्यात का गेले? सौरव यांच्या याच 'का' या प्रश्नावर सोशल मीडियावर चर्चा सुरू झाली.

स्वस्तिका मुखर्जी यांनी एका मुलाखतीत सौरव यांना प्रत्युत्तर देताना सांगितले की, एक सार्वजनिक व्यक्ती म्हणून काय बोलायचे याची जाणीव असणे गरजेचे आहे. सौरव गांगुली एसी फ्लोअरवर नॉन-फिक्शन शो शूट करतात. त्यामुळे प्रत्यक्ष परिस्थितीत कलाकारांना कोणत्या अडचणींना सामोरे जावे लागते, हे त्यांना कदाचित ठाऊक नाही. जर राहुल पाण्यात उतरले नसते, तर निर्मात्यांनी दुसऱ्या कलाकाराला घेतले असते. सामान्य कलाकारांसाठी काम हेच उपजीविकेचे साधन असते. नकार दिल्यास करिअर धोक्यात येऊ शकते. अशा वेळी एखाद्याच्या मृत्यूवर अशा प्रकारचे प्रश्न विचारणे ही असंवेदनशीलता आहे.

# मंत्री मकरंद पाटील सव्वा वर्षापासून शासकीय निवासाच्या प्रतीक्षेत



■ मुंबई

**बहुतांश** मंत्र्यांना शासकीय बंगले व आलिशान निवासस्थाने उपलब्ध असताना, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांना मात्र गेल्या सव्वा वर्षापासून अधिकृत निवासस्थानासाठी प्रतीक्षा करावी लागत आहे. पाटील सध्या आकाशवाणी आमदार निवासातील १२० क्रमांकाच्या सदनिकेतून आपला प्रशासकीय कारभार सांभाळत आहेत.

पाटील यांच्याकडे राज्याच्या मदत व पुनर्वसन विभागाची जबाबदारी आहे. एका मंत्र्यालाच हक्काच्या निवासासाठी एवढा कालावधी प्रतीक्षा करावी लागत आहे. मंत्र्यांना निवासस्थान व कार्यालयांचे वाटप करण्याची जबाबदारी सामान्य प्रशासन विभागावर असून, दुरुस्तीची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागावर आहे. त्यांना निवासस्थान उपलब्ध करून देण्यात हे विभाग अपयशी ठरल्याची टीका होत आहे.

त्यांना मंजूर सुरुची इमारतीतील सदनिका सध्या दुरुस्तीच्या प्रक्रियेत अडकली. कंत्राटदाराचे बिल प्रलंबित असल्याने काम रखडले. याबाबत मुख्य अभियंता (प्रेसिडेन्सी विभाग) प्रज्ञा वाळके यांनी सांगितले की, मंत्री पाटील यांना सुरुची इमारतीतील सदनिका देण्यात आली. ताबा मिळण्यास विलंब झाला असला, तरी दुरुस्तीचे काम पूर्ण झाल्यानंतर लवकरच ही सदनिका त्यांच्या ताब्यात दिली जाईल.

# मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या टर्मिनल १ परिसराला आग

■ मुंबई

**मुंबई** आंतरराष्ट्रीय विमानतळावरील टर्मिनल १च्या धावपट्टी परिसराला आज संध्याकाळी आग लागली. क्षणातच आगीने अक्राळविक्राळ रुप धारण केले. ही आग शॉर्टसर्किटमुळे लागल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

या आगीमुळे विमानतळावरील प्रवेशद्वार तासभर बंद करण्यात आले होते. टर्मिनल १ वरील विमानांची उड्डाणे काही काळ थांबवण्यात आली. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. या घटनेत जीवितहानी झाली नसली तरी विमानतळावरील प्रवेशद्वार बंद करण्यात आल्याने प्रवाशांमध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. अग्निशमन दलाच्या जवानांनी शर्थीचे प्रयत्न करून काही तासांत आगीवर नियंत्रण मिळवले.

# मुंबईत ३१ मेपर्यंत नालेसफाई पूर्ण करा पालिका आयुक्त भिडे यांचे आदेश

■ मुंबई

**मुंबईतील** नालेसफाईचे काम ३१ मेपर्यंत शंभर टक्के पूर्ण करण्याचे निर्देश महापालिका आयुक्त अश्विनी भिडे यांनी अधिकाऱ्यांना दिले. नाल्यांमध्ये कचरा टाकला जातो, त्या ठिकाणी जाळ्या बसवण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या.

महापालिका आयुक्त अश्विनी भिडे यांनी मिठी नदी तसेच शहरातील सर्व लहान-मोठ्या नाल्यांमधील गाळ काढण्याच्या कामाचा आढावा घेतला. पावसाळ्यात पाणी साचण्याची शक्यता असलेल्या ठिकाणांवर विशेष लक्ष ठेवून कोणत्याही प्रकारचा विलंब किंवा हलगर्जीपणा न करता गाळ उपसा प्राधान्याने पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

भिडे यांनी वांद्रे-कुर्ला संकुलातील जेतवन उद्यान परिसरातील मिठी नदी, वरळी येथील नेहरू विज्ञान केंद्राजवळील नाला, दादर-धारावी नाल्याच्या कामांची पाहणी केली. यावेळी अतिरिक्त आयुक्त अभिजित बांगर आणि अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मिठी नदीच्या पट्ट्यात तसेच नाल्यांमध्ये पावसाळ्यात पाणी साचणाऱ्या ठिकाणांवर लक्ष केंद्रित करून कचरा व गाळ प्राधान्याने काढण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

# धनंजय मुंडेंना पुन्हा मंत्री करा बीडमध्ये फडणवीसांकडे मागणी

■ बीड

**मुख्यमंत्री** देवेंद्र फडणवीस आज बीड दौऱ्यावर होते. यावेळी ते बीड जिल्ह्यातील श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडावर आयोजित ९४ व्या नारळी सप्ताहाच्या सांगता सोहळ्यात सहभागी होते. या कार्यक्रमात फडणवीस यांच्यासह मंत्री पंकजा मुंडे, आमदार सुरेश धस आणि अजित पवार गटाचे धनंजय मुंडे हे नेते एकाच मंचावर उपस्थित होते. याआधी एकमेकांवर टीका करणारे नेते एकत्र आल्याने उपस्थितांमध्ये चर्चा रंगली. कार्यक्रमादरम्यान भाविकांनी धनंजय मुंडे यांना पुन्हा मंत्री करा, अशी मागणी केली. भाविकांकडून झालेल्या मागणीवर फडणवीस यांनी हसत हसत मान डोलावली. मात्र तोंडाने एक शब्दही बोलले नाहीत. या घटनेमुळे मुंडेंच्या मंत्रिपदाची नव्याने चर्चा सुरू झाली.

यावेळी फडणवीस म्हणाले की, मला या कार्यक्रमाचे निमंत्रण एक वर्षापूर्वीच मिळाले होते. वामनभाऊंचा वारसा विठ्ठल महाराज पुढे नेत आहेत. आम्ही इथे पदामुळे नाही, तर भक्त म्हणून आलो आहोत.

# केवळ अंतर्गत समिती नसल्याने छळाची चौकशी अवैध ठरत नाही

हायकोर्टाकडून औद्योगिक न्यायालयाचा निर्णय रद्द

■ मुंबई

**कार्यालय** व इतर कामांच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळाबाबत मुंबई उच्च न्यायालयाने आज महत्त्वपूर्ण निकाल दिला. एखाद्या आस्थापनेत लैंगिक छळाच्या तक्रारीची चौकशी करताना केवळ 'विशाखा मार्गदर्शक' तत्त्वांनुसार तक्रार निवारण समिती स्थापन केली नव्हती. या एकाच कारणावरून संपूर्ण विभागीय चौकशी अवैध ठरवता येणार नाही, असा निर्वाळा न्यायमूर्ती अमित बोरकर यांनी एका प्रकरणात दिला आणि नाशिक येथील औद्योगिक न्यायालयाने दिलेला निर्णय रद्दबातल ठरवला. ग्लॅक्सोस्मिथक्लाईन फार्मास्युटिकल्स कंपनीच्या नाशिक युनिटमधील कर्मचारी महिलेने २०११ मध्ये सुहास पगारे यांच्याविरोधात लैंगिक छळाची तक्रार केली होती.

त्याआधारे कंपनीने चौकशी अधिकारी नेमून चौकशी केली आणि पगारे यांना दोषी ठरवत ७ डिसेंबर २०१२ रोजी कामावरून काढून टाकले. त्या कारवाईविरोधात पगारे यांनी औद्योगिक न्यायालयात दाद मागितली होती. त्यावर संबंधित चौकशी विशाखा मार्गदर्शक तत्त्वांनुसार समितीने न केल्यामुळे ती बेकायदेशीर ठरत असल्याचे औद्योगिक न्यायालयाने नमूद केले.

औद्योगिक न्यायालयाचा हा निर्णय चुकीचा असल्याचे निरीक्षण नोंदवत न्यायमूर्ती अमित बोरकर यांनी तो रद्दबातल ठरवला. चौकशी केवळ तांत्रिक कारणावरून रद्द करण्याऐवजी कर्मचाऱ्याला बचावाची पुरेशी संधी दिली होती का आणि नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचे पालन झाले होते का, हे पाहणे महत्त्वाचे आहे.

# कुलाब्यातील सिमेंट रस्त्याचे कंत्राट रद्द करण्याची नार्वेकरांची मागणी

■ मुंबई

**कुलाबा** येथील सिमेंट काँक्रिट रस्त्याचे एनसीसी लिमिटेड या कंपनीला दिलेले कंत्राट तत्काळ रद्द करा, अशी मागणी स्थानिक नगरसेवक मकरंद नार्वेकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालिका आयुक्त अश्विनी भिडे यांच्याकडे लेखी पत्राद्वारे केली.

या कंपनीने निविदेतील अटी-शर्थींचा भंग केला. रस्त्याच्या बांधकामात प्रचंड विलंब केला आहे. कंपनीने परस्पर उप कंत्राटदाराला रस्त्याचे काम दिले, असा आरोप त्यांनी केला. नाथालाल पारेख मार्ग आणि प्रकाश पेठे मार्ग या रस्त्यांच्या सिमेंट काँक्रिटीकरणाचे काम अवघ्या चार महिन्यांत पूर्ण झाले आहे. मात्र कुलाब्यासारख्या महत्त्वाच्या भागातील रस्त्याचे कंत्राटीकरण दीड वर्षांपर्यंत रखडले आहे. कागदोपत्री रस्त्याचे काम पूर्ण झाल्याचे दाखवण्यात आले आहे. मात्र प्रत्यक्षात रस्त्याचे डक्टिंग आणि पादचारी मार्गाचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही. त्यामुळे परिसरातील रहिवाशांना नाहक त्रास सहन करावा लागतो. निविदेतील अटींनुसार कंत्राटदाराला परस्पर दुसऱ्या कंत्राटदाराकडे काम सोपवता येत नाही. परंतु एनसीसी कंपनीने बेकायदेशीरपणे उप कंत्राटदारांवर काम सोपवले आहे. त्यामुळे निविदेतील अटींचे उल्लंघन होत आहे, असे नार्वेकर यांचे म्हणणे आहे.

नवाकाळ

• मुंबई । शुक्रवार १० एप्रिल, २०२६ • पान -८

## ‘नीला’ रोबोटने मतदारांचे स्वागत केले

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

**नवी दिल्ली -** पद्दुचेरी विधानसभा निवडणूक मतदानाच्या वेळी आज अनोखा नजारा पाहायला मिळाला. पुद्दुचेरीतील व्हीओसी सरकारी शाळेच्या मतदान केंद्रावर साडी घातलेल्या नीला नावाच्या रोबोटने मतदानासाठी आलेल्या मतदारांचे स्वागत केले. इव्हेंट-आधारित इंटरॅक्टिव मशीन म्हणून विकसित केलेल्या या रोबोटला मतदानासाठी येणाऱ्या मतदारांचे स्वागत आणि त्यांना मदत करण्यासाठी तैनात करण्यात आले होते. लग्न, शासकीय कार्यक्रम आणि निवडणुका अशा विविध कार्यक्रमांसाठी याचा वापर करता येतो. आम्ही कोईंबतूरहून आलो आहोत. ‘नीला’ रोबोट स्वत: इंग्रजी व तामिळ भाषेतून बोलू शकतो. त्याचा आवाज जवळ उभ्या असलेल्या व्यक्तीला ऐकू येतो.



# कुणाचेही कौतुक करण्याची सोय उरली नाही

## आज कौतुक करा .... तो उद्या शेण खातोच खातो

**सुजीतचंद्र भोगले**



मानवी देह हा पंच महाभूतांचा बनलेला आहे. मृत्योर्परांत या पंच महाभूतांना त्यांचा त्यांचा वाटा परत देणे हे कर्तव्य आहे म्हणून मृताचे अंत्यसंस्कार करण्याची परंपरा निर्माण झाली आहे. जगातील सगळे समाज/धर्म आपआपल्या पद्धतीने ही परंपरा पालन करतात. सर्व सनातन धर्मीय अग्नीला अर्पण करतात. सनातन धर्म आत्म्याचे अविनाशी स्वरूप मान्य करतो आणि त्यामुळे त्याला पुढील जन्म प्राप्त होईपर्यंत त्या आत्म्याला सूक्ष्म स्वरुपात अन्न पुरवणे हे कर्तव्य समजतो. त्यातून श्राद्ध संकल्पना उद्भवली आहे. साधारण अशीच काहीशी संकल्पना असल्याने मुस्लीम शब ए बारात आणि ख्रिस्ती हॅलोवीन साजरा करतात.

दशक्रिया विधी हा पिंड प्रदान करणे आणि अस्थि विसर्जन याशी निगडीत आहे. तेराव्याला मृतात्म्याच्या स्मृतिप्रित्यर्थ आणि त्या निमित्ताने आपल्या सांत्वनाला आलेल्या आप्तेष्ट मंडळींना गोड जेवण देऊन आपण सामाजिक ऋण फेडत असतो. तेराव्या दिवशी ब्रह्मदेवाचे पूजन आणि पुण्याहवाचन करून आपण मृत व्यक्तीचा शोक संपवून पुनश्च आपल्या नित्य कर्मांना लागणार असतो.

आता दहाव्याचे आणि तेराव्याचे विधी न करणे ही काही फार मोठी सामाजिक क्रांती घडवणारी गोष्ट नाही. तुम्हाला दशक्रिया विधी आणि पिंड प्रदान हे थोतांड वाटू शकते. तुम्हाला तेराव्याला समस्त आप्तेष्ट मंडळींना खायला घालणे हा फुकटचा खर्च वाटू शकतो. दशक्रिया, पुण्याहवाचन, पिंड प्रदान करणे या सगळ्या कर्मांसाठी एका ब्राह्मणाला आमंत्रित करून त्याला दक्षिणा देणे हा तुम्हाला फुकटचा खर्च वाटू शकतो. तेराव्याचे जेवण घालणे, त्यासाठी आचारी, वाढपी, राशन ही सगळी उधळपट्टी वाटू शकते.

हा खर्च वाचवणे आणि निरर्थक प्रथांना तिलांजली देणे (क्षमस्व तिलांजली हा सुद्धा श्राद्धकर्मातील एक विधीच आहे.) या निरर्थक प्रथांना मूठमाती देणे (क्षमस्व हा सुद्धा तत्सम एक विधीच आहे) या निरर्थक प्रथांचा त्याग करणे हे तुम्हाला विवेकवादी, पर्यावरणवादी आणि पुरोगामी नक्कीच वाटू शकते.

परंतु ते तसे नाही.

या सगळ्या प्रथा थोतांड आहेत. ब्राह्मण समाजाचे पोट भरण्याचे उद्योग आहेत. हे स्पष्ट बोलण्याचे धाडस करून या प्रथा नाकारण्यासाठी सुद्धा एक धाडस लागते आणि ते तुमच्याकडे नाही हे तुम्ही सिद्ध केले आहे.

स्पष्ट बोला, या प्रथा परंपरांचा त्याग करा आणि मग याची भविष्यात काही फळे भोगावी लागली तरी छाती काढून भोगा...

विवेकवाद, पर्यावरण प्रेम असल्या शब्दांच्या बुडबुड्यांच्या आड कशासाठी लपत आहात?

आणि हे विधी तुम्ही ज्या मृत मातेसाठी करत आहात किंवा करणे नाकारत आहात तिची इच्छा काय होती? तिचे असे विधी व्हावे किंवा नाही?

जर तिला हे विधी व्हावे असे वाटत असेल तर आईची शेवटची इच्छा सुद्धा पूर्ण न करून तुम्हाला नक्की काय मिळणार आहे?

यावर जरूर विचार करा... ज्या मंडळींना मुंडे यांचे वर्तन योग्य वाटत असेल त्यांनी सुद्धा या मुद्यांचा जरूर विचार करा.

**गेल्या तीन पिढ्या पुरोगामी असणारे, हिंदू धर्माला शिव्या देणारे, १९५६ साली हिंदू धर्माला लाथ मारणारे आता लपून छपून श्राद्ध-पक्ष, कुलस्वामिनी दर्शन, कुलधर्म कुलाचार पालन सगळे करू लागले आहेत... त्याचे कारण माणूस स्वत: नियतीचे खेळ सहन करू शकतो. पण आपल्या मुलाबाळांचे कोणतेही लॉजिकल** explanation **नसणारे हाल होऊ लागले की, सुतासारखा सरळ होतो.**

**तळटीप** - दशक्रिया विधी मध्ये काय होते?

आपण पिंड प्रदान करतो.

कुणाला?

जो प्रेतात्मा आहे (नुकतीच निवर्तलेली व्यक्ती)

जो त्या प्रेतात्म्याला मृतांच्या जगतात नेण्यासाठी आला आहे. अर्थात प्रेतसखा अशी व्यक्ती जिचे श्राद्ध कर्म कोणीही करणार नाही. जी निपुत्रिक आहे, जो शस्त्र आघाताने मेला आहे, अपघातात मेला आहे, आत्महत्या केल्याने मेला आहे आणि ज्याचा आत्मा भटकतो आहे त्याला पण आपण पिंड प्रदान करतो. का?

कारण तो पण आपल्या प्रेतात्म्यासह पुढील गतीला प्राप्त व्हावा म्हणून... (हा आपला कोणीही नाही. निखळ मानवता या दृष्टीने आपण हे करतो.) याशिवाय त्रिपिंडी असते ज्यात आपण आपल्या आई आणि वडिलांच्या कुळातील गेल्या तीन पिढीतील समस्त मृत व्यक्तींना शांती आणि पुढील गती प्राप्त व्हावी म्हणून त्यांचे नामोच्चारण करून त्यांच्यासाठी पिंड अर्पण करतो.

**पिंड म्हणजे काय?**

भात, मध, साखर, काळे तीळ आणि तूप यांचे मिश्रण केलेला गोळा.

या पिंडाचे नंतर काय होते?

पूजा विधी पूर्ण झाला की, एक पिंड झाडाखाली / कावळ्यासमोर ठेवतात. कावळ्याने त्याला स्पर्श करून खाल्ले तर प्रेतात्मा त्या स्थानी नसून तो पुढील गतीला प्राप्त झाला आहे असे मानले जाते. कावळ्याने पिंडाला स्पर्श न करणे याचा अर्थ प्रेतात्मा तिथे घुटमळतो आहे. मग त्याने जगताचा मोह सोडून पुढे जावे म्हणून त्याला काही आश्वासन आणि वचन दिले जाते.

उर्वरित पिंड नदीत प्रवाहीत केले जातात.

थोडक्यात ही जी काही पूजा आहे त्यात ब्राह्मण व्यक्तिला ही सर्व पूजा करण्याचे पैसे मिळतात. त्या बदल्यात तो ही ३-४ तासांची पूजा करतो.

पिंड आणि फुले/पाने हे सगळे नदीत प्रवाहीत केले जाते आणि मासे हे अन्न म्हणून खाऊ शकतात.

आता हे सगळे केल्याने पर्यावरणाचे काय नुकसान झाले हे तुकाराम मुंडे सांगू शकतील?

बरं असली मंडळी शब ए बारात वर गप्प असतात आणि यांचीच पोरे **hallow ween** ला भूत खेत बनून फिरतात.

**तळटीप २ -**

ना खुदा मिला
ना विसाले सनम
ना इधर के रहे
ना उधर के

प्रशासकीय अधिकारी तुकाराम मुंडे हे त्यांच्या मातोश्रींचे अंत्यसंस्कार कसे करतात यात नाक खुपसण्याची एक सनातनी म्हणून आम्हाला काहीही आवश्यकता नाही. परंतु त्यांनी स्वतः या संदर्भात वक्तव्य करून स्वतःची प्रसिद्धी लोलुपता प्रदर्शित केलीच आहे तर आता त्यांना सच का सामना करावाच लागेल.



## नव्या युगातील तुकाराम माहीत नाहीत
## मुंढेंच्या बदलीवर सदाभाऊ खोतांचा टोला

■ मुंबई

**राज्यातील** कडक शिस्तीचे आणि धडाकेबाज कामासाठी ओळखले जाणारे सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांची अवघ्या आठ दिवसांपूर्वी दिव्यांग विभाग मंत्रालयाच्या सचिवपदावर नियुक्ती झाल्यानंतर त्यांची आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागात बदली करण्यात आली. माझं घराणं वारकरी संप्रदायाचं आहे. संत तुकाराम महाराजांविषयी मला चांगली माहिती आहे. माझे वडील वारकरी होते, त्यांना अनेक अभंग पाठ होते. पण नव्या युगातील तुकारामांबाबत मला फारशी माहिती नाही, असे वक्तव्य खोत यांनी केले. एका कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याबद्दल थेट भाष्य करण्याऐवजी त्यांनी असा टोला लगावल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

नांदेड दौऱ्यात सदाभाऊ खोत यांनी परिवहन विभागीय कार्यालयाला अचानक भेट दिली. या पाहणीत विभाग नियंत्रक चंद्रकांत वडस्कर अनुपस्थित असल्याचे आढळल्याने खोत संतापले. ठरलेल्या वेळेनंतरही अधिकारी कार्यालयात नसल्यामुळे त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. आपला निषेध नोंदवण्यासाठी खोत यांनी अधिकाऱ्याच्या रिकाम्या खुर्चीला हार अर्पण केला. तसेच, एसटी कर्मचाऱ्यांच्या बदलीसाठी पैशांची मागणी केल्याचा गंभीर आरोपही त्यांनी केला. संबंधित अधिकाऱ्यावर तत्काळ कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी परिवहन मंत्र्यांकडे केली आहे.

## सावरकरांना ‘स्वातंत्र्यवीर’ उपाधी सरकारने बहाल केलेली नाही

**पणतू सात्यकींचे कोर्टात निवेदन**

■ पुणे



**स्वातंत्र्यवीर** विनायक दामोदर सावरकर यांना स्वातंत्र्यवीर ही उपाधी कोणत्या सरकारने दिलेली नाही. त्यांच्यावरील प्रेमापोटी जनतेने त्यांना ती बहाल केली होती, असे पुस्तकात नमूद केले आहे. मात्र जनतेने ही उपाधी दिल्याचा कोणताही पुरावा नाही असे निवेदन स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे पणतु सात्यकी सावरकर यांनी पुणे न्यायालयात केले. काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्याविरुद्ध सात्यकी यांनी दाखल केलेल्या सावरकरांच्या बदनामीच्या खटल्याची सुनावणी झाली. त्यावेळी सात्यकी यांनी हे निवेदन केले.

राहुल गांधी यांनी लंडनमध्ये मार्च २०२३ मध्ये केलेल्या एका भाषणावरून सात्यकी यांनी राहुल गांधींनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांची बदनामी केल्याचा खटला दाखल केला आहे. या भाषणात राहुल गांधी यांनी सावरकर हे कट्टर हिंदुत्ववादी आणि मुस्लीमद्वेष्ट्ये होते असे दाखवण्यासाठी सावरकरांच्या लिखाणातील एक किस्सा सांगितला होता. आपण (सावरकर) आणि आपल्या काही सहकाऱ्यांनी एका मुस्लीम तरुणाला मारहाण केली होती. त्यावेळी आम्हाला खूप आनंद झाला होता, असे सावरकर यांनी एका ठिकाणी लिहिले आहे, असा दावा राहुल गांधी यांनी केला होता. यावर आक्षेप घेत राहुल गांधींचे हे वक्तव्य धादांत खोटे, दिशाभूल करणारे आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांची बदनामी करणारे आहे, अशी तक्रार सात्यकी यांनी केली होती. त्यासंबंधीचा हा खटला आहे.

## बंगालमध्ये पंतप्रधानांनी सहा हमी दिल्या
## सरकारी कर्मचाऱ्यांना ७व्या वेतन आयोगाचा लाभ

■ कोलकाता

**पश्चिम** बंगाल विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपाने प्रचार मोहिमेला वेग दिला. त्याच अनुषंगाने पंतप्रधान नरेंद्र मोदी आज पूर्व मेदिनीपूरमध्ये झालेल्या सभेत त्यांनी राज्य सरकारवर टीका केली. पंतप्रधान मोदी यांनी भाजपा सरकारच्या सहा हमी जाहीर केल्या. भीतीऐवजी विश्वास निर्माण करू, भ्रष्टाचार करणाऱ्यांना तुरुंगात पाठवू, भ्रष्टाचार व गुन्ह्यांच्या फाईल्स उघडू, कायदा सर्वांचा हिशेब करेल, घुसखोरांना बाहेर काढू, सरकारी कर्मचाऱ्यांना ७ व्या वेतन आयोगाचा लाभ देऊ. यांचा त्यात समावेश आहे.

मोदी म्हणाले की, या वेळी बंगालची जनता ममता सरकारला हटवणार आहे. आम्ही ‘सबका साथ, सबका विकास’, लुटारूं का हिसाब करणार आहोत. ही निवडणूक विकसित बंगालसाठी मजबूत पाया घालण्याची आहे आणि त्यासाठी सर्वात पहिले पाऊल म्हणजे या निर्दयी सरकारला सत्तेबाहेर करणे.

पंतप्रधानांनी ममता सरकारवर विविध मुद्यांवर टीका करताना म्हटले की, बंगालमध्ये मत्स्यपालन आणि सी-फूड क्षेत्रात प्रचंड संधी आहे. तरीही राज्य मासे उत्पादनात आत्मनिर्भर झालेले नाही. मोठी मागणी असूनही इतर राज्यांतून मासे आयात करावे लागतात. १५ वर्षे सत्तेत असूनही सरकार मूलभूत गरजाही पूर्ण करू शकले नाही, हे त्यांच्या चुकीच्या धोरणांचे उदाहरण आहे.

## जनगणनेत बौद्धांची नोंद अनुसूचित जातीत करावी
## केंद्रीय मंत्री आठवलेंची राज्यपालांकडे मागणी

■ मुंबई



**केंद्रीय** सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आगामी जनगणनेत महाराष्ट्रातील धर्मांतरीत बौद्धांची नोंद बौद्ध धर्मासह अनुसूचित जाती प्रवर्गात करावी, अशी मागणी राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्याकडे केली. यामुळे बौद्धांना सामान्य श्रेणीत न मोजता त्यांच्या हक्काचे प्रतिनिधित्व आणि सवलती कायम राहतील, अशी भूमिका त्यांनी यावेळी मांडली. राजभवनात राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्यासोबत झालेल्या बैठकीदरम्यान केंद्रीय मंत्री आठवले यांनी ही मागणी केली.

यावेळी त्यांनी या विषयावर राज्य सरकारला विशिष्ट निर्देश देण्याची मागणी करणारे निवेदन दिले. त्यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे की, सध्या सुरू असलेल्या जनगणनेमध्ये अनुसूचित जातीमधून बौद्ध धम्मात धर्मांतर केलेल्या बौद्धांची जनगणना करताना धर्माच्या रकान्यात बौद्ध धम्म आणि जातीच्या रकान्यात अनुसूचित जात असे लिहून अनुसूचित जातीतून त्यांनी धर्मांतर केले आहे. त्या जातीचा अनुक्रमांक लिहिण्यात यावा. त्यामुळे महाराष्ट्रातील अनुसूचित जातीतून बौद्ध धम्मात धर्मांतर केलेल्या जातीत नोंद केली जाईल. याबाबत बौध्दांची जनगणनेत अनुसूचित राज्यपालांनी सरकारला बौध्दांच्या जनगणनेबाबत सूचना द्याव्यात.



कांची कामकोटी पीठाचे शंकराचार्य विजयेंद्र सरस्वती यांच्या हस्ते आज माटुंगा येथील सुमारे चारशे वर्षे जुने श्री मरुभाई गावदेवी मंदिरात तिसरे अष्टबंधनम जीर्णोद्धारम महाकुंभाभिषेकम संपन्न झाले. मंदिराचे आणि मंदिरातील देवतांचे पावित्र्य अबाधित राखण्यासाठी दर बारा वर्षांनी महाकुंभाभिषेकम हा विधी केला जातो. (छाया : दीपक साळवी)

## शारदा चिट फंड प्रकरणाचा सूत्रधार
## सुदिप्ता सेनला १३ वर्षांनंतर जामीन

■ कोलकाता

**पश्चिम** बंगालमधील कोट्यवधी रुपयांच्या शारदा चिट फंड घोटाळ्यातील मुख्य सूत्रधार सुदिप्ता सेन याची १३ वर्षांनंतर कोलकाता उच्च न्यायालयाने जामिनावर मुक्तता केली. सुदिप्ता सेन याच्याविरूध्द या प्रकरणात ३०० हून अधिक फौजदारी गुन्हे दाखल आहेत.

पश्चिम बंगालच्या २४ परगणा जिल्ह्यातील बारासात पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या दोन गुन्ह्यांमध्ये कोलकाता उच्च न्यायालयाच्या संयुक्त खंडपीठाने सेन याला ५ हजार रुपयांचा वैयक्तिक जातमुचलका आणि दोन जामीनदार देण्याच्या अटीवर जामीन मंजूर केला आहे. त्यामुळे त्याचा कारागृहाबाहेर पडण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या प्रकरणातील अन्य सर्व गुन्ह्यांमध्ये सेनला जामीन मंजूर झाला आहे. यामध्ये सीबीआयने दाखल केलेल्या चार फौजदारी गुन्ह्यांचाही समावेश आहे. २०१३ साली शारदा चिट फंड घोटाळा उघड झाल्यानंतर सेन याला जम्मू आणि काश्मिरमधून अटक करण्यात आली होती.

## दिल्ली विधानसभा, सचिवालय
## बॉम्बने उडवण्याची धमकी

■ नवी दिल्ली

**नवी दिल्ली** येथे आज सकाळी बॉम्बस्फोटाच्या ई-मेल धमकीमुळे खळबळ उडाली. दिल्ली विधानसभा, सचिवालय, काही शाळा आणि एका मेट्रो स्थानकावर स्फोट घडवण्याची धमकी देणारा ई-मेल अनेक अधिकृत आयडींवर पाठवण्यात आला. या धमकीनंतर दिल्ली पोलिसांनी तत्काळ विधानसभा परिसर, सचिवालय, संबंधित शाळा आणि मेट्रो स्थानकांवर मोठ्या प्रमाणात सुरक्षा तपासणी सुरू केली. बॉम्ब शोधक पथके आणि श्वान पथके तैनात करून सर्व ठिकाणी कसून झाडाझडती घेतली.

## हिंदू तरुणाला नमाज पठणास भाग पाडले! बीफ खाऊ घातले

**नाशिकमधील कंपनीवर आरोप**

■ नाशिक

**नाशिकमधील** एका नामांकित बहुराष्ट्रीय आयटी कंपनीत महिला कर्मचाऱ्यांवर लैंगिक व मानसिक अत्याचार तसेच धार्मिक भावना दुखावल्याच्या गंभीर घटना उघडकीस आल्याने खळबळ उडाली आहे. या प्रकरणात आता नवे आरोप करण्यात आले असून, एका हिंदू तरुणाला नमाज पठणास भाग पाडण्यात आल्याचा तसेच त्याला जबरदस्तीने बीफ खाण्यास प्रवृत्त केल्याचा दावा करण्यात आला आहे.

संबंधित कंपनीत सुमारे ३०० कर्मचारी कार्यरत असून, गेल्या चार वर्षांपासून काही टीम लीडर्सकडून महिला कर्मचाऱ्यांचा छळ होत होता. कामाच्या ठिकाणी महिलांकडे अश्लील नजरेने पाहणे, अयोग्य हावभाव करणे तसेच त्यांच्या धर्माबाबत आक्षेपार्ह वक्तव्य करणे, असे प्रकार घडत होते. या प्रकरणात एका विवाहित संशयिताने लग्नाचे आमिष दाखवून एका महिला सहकाऱ्याचे लैंगिक शोषण केल्याचा आरोप आहे. त्र्यंबक रोड परिसरात तसेच कार्यालयातही तिचा छळ करण्यात आल्याचे फिर्यादीत नमूद आहे. याशिवाय आठ महिलांनी लैंगिक छळ आणि धार्मिक भावना दुखावल्याच्या तक्रारी नोंदवल्या आहेत.

## मालाड दंगलप्रकरणी कारवाई
## अवैध बांधकामांवर बुलडोझर

■ मुंबई

**मालाड** पूर्व येथील दिंडोशी परिसरात झालेल्या दंगलप्रकरणी प्रशासनाने कठोर भूमिका घेत मोठी कारवाई केली आहे. संतोष नगर परिसरातील हिंसाचारानंतर संबंधित आरोपींच्या अवैध बांधकामांवर आज बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून बुलडोजर कारवाई करण्यात आली. दंगलीनंतर महानगरपालिकेकडून संबंधित बांधकामांना नोटीस बजावण्यात आली होती. २४ तासांचा अवधी देऊनही समाधानकारक उत्तर न मिळाल्याने आज प्रशासनाने थेट कारवाई करत बुलडोझरच्या सहाय्याने बांधकाम पाडले. या कारवाईदरम्यान मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता आणि संपूर्ण मोहिम शांततेत पार पडली. ही दंगल ५ एप्रिलच्या रात्री संतोष नगरमध्ये देवी मरियम्मा पूजेसाठी निघालेल्या त्रिशूल यात्रेदरम्यान उसळली होती. लाउडस्पीकरवर भजन लावण्याच्या कारणावरून दोन गटांमध्ये वाद निर्माण झाला.

## राज्यातील २९ साखर कारखान्यांकडे
## १ हजार कोटी रुपयांची थकबाकी

■ मुंबई

**राज्यातील** २०२५-२६ हंगामातील सुमारे १,०१२ कोटी रुपयांच्या थकीत एफआरपीप्रकरणी साखर आयुक्तालयाने २९ साखर कारखान्यांना नोटिसा बजावल्या आहेत. या संदर्भातील सुनावणी सोमवारी १३ एप्रिल रोजी सकाळी साडेअकरा वाजता साखर संकुल येथे होणार असल्याची माहिती साखर संचालक (अर्थ) यशवंत गिरी यांनी दिली. उसाची रास्त आणि किफायतशीर किंमत (एफआरपी) थकीत राहिल्याने शेतकऱ्यांकडून सातत्याने रक्कम मिळावी, अशी मागणी होत आहे. ३१ मार्च २०२६ अखेर ज्या कारखान्यांनी ८० टक्क्यांपेक्षा कमी एफआरपीची रक्कम दिली आहे, अशा एकूण ५३ कारखान्यांची नोंद करण्यात आली होती. त्यापैकी २४ कारखान्यांच्या सुनावण्या यापूर्वी पूर्ण झाल्या असून, उर्वरित २९ कारखान्यांना आता नोटिसा देण्यात आल्या आहेत. नोटिसा पाठविण्यात आलेल्या कारखान्यांमध्ये कोल्हापूर, सांगली, सोलापूर, सातारा, नाशिक, परभणी, छत्रपती संभाजीनगर, लातूर, धाराशिव, जालना, नांदेड, हिंगोली, पुणे, नंदुरबार, अहिल्यानगर आणि बीड जिल्ह्यांतील कारखान्यांचा समावेश आहे.